बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

## माजलगाव येथे वृक्षारोपण उत्साहात

माजलगाव : महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त बीड जिल्हा उपाध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेस शेख सलीम यांनी माजलगाव धरण मैदान येथे आमदार प्रकाश दादा सोळंके व जयसिंग भैय्या सोळंके यांच्या मार्गर्शनाखाली वृक्षारोपण कऱण्यात आले.सध्या वाढत्या तापमानामुळे वृक्ष लागवडीचे महत्त्व अधोरेखित झाले असून वृक्ष लागवडी सोबत वृक्ष संवर्धनाची भूमिका महत्त्वाची असून यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याने वृक्ष संवर्धनासाठी कार्यरत असणाऱ्या उपक्रमांना सहकार्य करणार असल्याचे बीड शेख सलीम यांनी यावेळी सांगितले. या वृक्षारोपणासाठी दिगंबर सोळंके यांच्या हस्ते व इतर उपस्थितीत गोविंद टाकणखार, सतीश चाळक, विशाल साळवे, फिरोज सर, जुबेर खान, शेख नासेर, बबलू सरवदे वृक्षारोपण करण्यात आले.

बीड | मंगळवार,दि.१६जुलै २०२४ | वर्षे३रे | अंक३५२वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३



शिवसंग्रामच्या रोजगार मेळाव्यात ७८४ तरुणांना मिळाल्या नोकऱ्या

# आशेचा किरण!!

समाज उपयोगी काम करत राहील:डॉ.ज्योती मेटे

- ऊसतोड मजुरांचा जिल्हा असणाऱ्या बीडमध्ये परिवर्तनाची नांदी
- शिवसंग्रामने बेरोजगार तरुणांसाठी राबविला अनोखा उपक्रम
- कुटुंबाचे आशास्थान असणाऱ्या पाल्यांनी उंचावली मान



आज तरुण मोठ्या प्रमाणात बेरोजगार आहेत त्यांच्यासाठी डॉ. ज्योती मेटे यांनी हा मेळावा आयोजित करून तरुणांच्या हाताला काम देत नोकऱ्या उपलब्ध करून दिल्या यात माझ्या मुलांनी देखील या रोजगार मेळाव्यात सहभाग नोंदवला यातून त्यांना नोकरी मिळाली त्याबद्दल त्यांचे खूप खूप आभार.
–शुभांगी कल्याणकर, पालक

या रोजगार मेळाव्यामुळे मला खूप लाभ झाला आहे. मेळाव्यातून मला रोजगार मिळाला असून मला बीडमध्येच रोजगार मिळाला याबद्दल मी खूप समाधानी आहे. याबद्दल मी डॉ.ज्योतीताई मेटे यांचे खूप खूप आभार व्यक्त करते.
–सयल रमेश भिताडे, नोकरी मिळालेली तरुणी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोकनेते विनायकराव मेटे यांच्या सामाजिक कार्याच्या प्रेरणेतून आणि शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांच्या संकल्पनेतून बीड जिल्हा शिवसंग्रामच्या वतीने भव्य रोजगार मेळावा काल दि. १५ जुलै सोमवार रोजी आशीर्वाद मंगल कार्यालय, बार्शी रोड, बीड येथे संपन्न झाला यावेळी या रोजगार मेळाव्यास शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योती विनायकराव मेटे, कार्यक्रमाचे अध्यक्ष अजय जहेर पाटील, प्रभाकर कोलंगडे, रमेश पोकळे, शेख शफीक, शेख निजाम, प्रा. प्रमोद कुलकर्णी, अनिल घुमरे, सुहास पाटील, प्रा. सुभाष जाधव,ऍड.मनीषा कुपकर,बाळासाहेब हावळे, सचिन काळकुटे, फाटक सर, मनोज जाधव आदी उपस्थित होते.

उच्चशिक्षित व कौशल्य प्राप्त युवकांसाठी नोकरी आपल्या दारी हा आगळावेगळा उपक्रम शिवसंग्रामने आज राबवला शेकडो बेरोजगार युवकांना विनासायास नोकरी या मेळाव्यात मिळाली, सुरुवातीला सकाळ पासून सुरू असलेल्या पाऊसा मुळे संथ गतीने सुरू झालेल्या प्रक्रियेने दुपार नंतर वेग घेतला , हजारो बेरोजगार युवक, तरुण सहभागी झाले होते. यात ७८४ तरुण मुला, मुलींना पुणे,छत्रपती संभाजी नगर, नगर आणि नागपूर येथे रोजगार मिळाला राज्यातील ४० नामांकित कंपन्या यात सहभागी झाल्या

यावेळी बोलताना डॉ. ज्योती मेटे म्हणल्या की,सामाजिक बांधिलकी जोपासणारे लोकनेते विनायकराव मेटे साहेब हे व्यक्तिमत्व आज जरी आपल्यात नसलं तरी त्यांच्या मार्गाने सदैव आम्ही वाटचाल करत राहू आणि लोकहिताचे पान २ वर...

## डॉ.अशोक थोरात यांना पितृशोक

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी



तालुक्यातील कुंबेफळ येथील आरोग्य विभागाचे मुंबईचे सहायक संचालक डॉ. अशोक थोरात यांचे वडील संपतराव किसनराव थोरात यांचे लातूर येथे सोमवारी (दि.१५) सायंकाळी ९ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले.

मृत्यूसमयी त्यांचे वय ८२ वर्षे होते. त्यांनी मृद व जलसंधारण विभागात पर्यवेक्षक पदावर काम केले होते. त्यांच्या पश्चात डॉ.अशोक थोरात, अजित थोरात ही दोन मुले, डॉ.प्रतिभा थोरात, जि.प.च्या माजी सदस्या डॉ.योगिनी थोरात या सुना, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. दरम्यान, अंत्यविधी आज (दि.१६) सकाळी १०:३० वाजता कुंबेफळ येथील शेतात होणार आहे. थोरात कुटुंबीयांच्या दुःखात दैनिक पुण्यभूमी परिवार सहभागी आहे.

## वंचितचे जिल्हा कचेरीसमोर
# धरणे आंदोलन

प्रशांत बोराडे : अन्यथा बेरोजगारी भत्ता देण्याची मागणी




बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

सम्यक विद्यार्थी आंदोलन बीड जिल्ह्याच्या वतीने आज जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलनाचे नेतृत्व सम्यकचे राज्य प्रवक्ते प्रशांत बोराडे यांनी केले. उच्च शिक्षित तरुणांच्या रोजगाराची व्यवस्था करा अन्यथा त्यांना बेरोजगारी भत्ता तरी द्या. महागाई निर्देशांकानुसार शिष्यवृत्तीची रक्कम वाढवा.

मागील शैक्षणिक वर्षातील प्रलंबित विद्यार्थ्यांची स्वाधार तात्काळ त्यांच्या खात्यात वर्ग करा. मुलींना मोफत शिक्षण या सरकारच्या घोषणेची तात्काळ अंमलबजावणी करा. इत्यादी विषयांवरती आज सम्यकने बीड जिल्हाधिकारी कार्यालय येथे पान २ वर...

## मारफळा येथे महिला मजूरांना मारहाण

तलवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

राजेगाव येथील काही महिला मारफळा येथे हेतखुरपणी करण्यासाठी गेल्या होत्या. वा महिलांनी खुरपणी कामाचे गुते घेतल्यामुळे त्यांनी हे काम पूर्ण करून दिले. मात्र शेताचे मालक अनिल गंगाधर राठोड, यानी या महिलांना काम एवढ्या लवकर कसे काय झाले म्हणत जातीवाचक शिवीगाळ मारहाण करून जखमी करून जीवे मारण्याची धमकी

दिल्यावरून तलवाडा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दखल करण्यात आला आहे.याबाबत सविस्तर असे की, भाम्मश्री उमेश साळवे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की दिं. १३–७–२०२४ रोजी अनिल गंगाधर राठोड राहणार मारफळा तांडा तालुका गेवराई जिल्हा बीड यांच्या शेतात खुरपणीसाठी बोलावल्यामुळे सकाळी १०:०० वाजेच्या सुमारास त्यांच्या मात्र फळा बेरेतील शेतात खुरपणीचे काम लागल्यामुळे गेलो होतो माझे सोबत सोनाली गौतम साळवे, रेखा अशोक साळवे, लक्ष्मी महादेव साळवे, सुनिता भारत भालेराव, निकिता आकाश साळवे, ज्या रामदास गायकवाड, सुषमा सिद्धार्थ साळवे, वंदना ज्ञानोबा साळवे चालक उमेश काबुबा साळनेअसे सर्वजण पान २ वर...




**परळी :** कर्तुत्वान निष्ठावंत कार्यकर्त्यांचे आदरयुक्त सन्मान बाजीराव भैय्यासाहेब धर्माधिकारी, वैजनाथराव सोळंके, आनंद इंगळे यांचा सन्मान करताना मंत्री धनंजय मुंडे, मनासारखा राजा राजासारख मन असणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे डीएम होय.

# 'फेक नरेटीव्ह' सेट करण्याचा प्रयत्न

आक्रमक | पंकजा मुंडेंकडून अब्रूनुकसान दाव्याचा इशारा

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

भाजपाच्या राष्ट्रीय सचिव तथा नवनिर्वाचित विधान परिषद सदस्य पंकजाताई मुंडे यांच्या बाबतीत जाणीवपूर्वक फेक नरेटिव्ह सेट व्हावा या दृष्टिकोनातून बातम्या चालवणे, ओढून ताणून कोणत्याही मुद्द्याला ताणून धरत,संबंध नसतांना पंकजाताई मुंडे यांच्या बाबतीतला राजकीय दृष्ट्या निगेटिव्ह नरेटिव्ह सेट व्हावा असे मुद्दामहून करण्याचे प्रकार अनेक वेळा घडलेले आहेत. याबाबत पंकजाताई आता संतप्त झाल्या असून या संबंधित चॅनलवर अब्रू नुकसानीचा दावा करणार असल्याचं ट्विट त्यांनी केलं आहे.



महाराष्ट्रात सध्या आयएएस पूजा खेडकर प्रकरण चर्चेत असून या प्रकरणात दररोज वेगवेगळे मुद्दे समोर येत आहेत. यातच पूजा खेडकर यांचा भाजपशी संबंध असून त्या पंकजाताई मुंडे यांच्या निकटवर्तीय असल्याच्या अतिरंजीत बातम्या चालवून केवळ सनसनाटी निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून व टीआरपीच्या मागे धावताना एखाद्या सार्वजनिक जीवनातील व्यक्तीच्या करिअरला बाधा आणण्याचे काम या माध्यमातून केले जात आहे. विशेष म्हणजे पंकजाताई मुंडे यांच्या विधानांमधून अर्धसत्य विधाने काढून तेवढ्याच नकारात्मक संदेश जाणाऱ्या बातम्या चालवणे, अनेक विधानांचे विपर्यास करणे, मनाला येईल ते अन्वयार्थ लावणे आदी विविध प्रकार पंकजाताई मुंडे यांच्या बाबतीत २०१४ पासून सुरू आहेत. हे कोणीतरी जाणीवपूर्वक करत असल्याचे दिसून येते. पंकजाताई मुंडे यांना नुकतीच विधान परिषदेवर पक्षाने संधी दिली आहे. त्यांना मंत्रीही केलं जाणार असल्याची मोठ्या प्रमाणावर चर्चा आहे. मात्र पंकजाताई मुंडे यांच्या राजकीय वाटचालीतील प्रगती डोळ्याला न देखवणाऱ्या लोकांनी पंकजाताई मुंडे यांच्या बाबतीत खोडसाळपणाने फेक नरेटिव्ह कसा सेट करता येईल यासाठी प्रयत्न सुरु केल्याचे दिसते. या संदर्भाने हे पूजा खेडकर प्रकरण संबंध नसताना पंकजाताई मुंडेंशी जोडून अतिरंजीत व सनसनीखेज बातम्या चालविण्याचा सपाटा काही चॅनल्सने सुरु केला आहे. यावर आता पंकजाताई मुंडे या संतप्त झाल्या आहेत. मुद्द्यांचे बोलणं सोडून चुकीच्या गोष्टी पसरविण्याकडे या वाहिन्यांचा इंटरेस्ट असल्याचे म्हटले असून माझ्यासोबत २०१४ पासून अशाच पद्धतीने सुरू असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या पुरोगामी महाराष्ट्रात असंच चालणार का अशी खंतही त्यांनी व्यक्त केली आहे.या संबंधित चॅनल्सवर आपण अब्रू नुकसानीचा दावा करणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

## भूमि अभिलेख विभागाकडून त्रास

आक्रमक :आ.संदीप क्षीरसागरांकडून तक्रार

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड मतदारसंघासह जिल्ह्यातून, भूमी अभिलेख विभागाकडून कामकाजासंबंधी अडवणूक आणि आर्थिक मागणी होत असल्याच्या तक्रारी शेतकरी आणि नागरिकांनी आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडे केल्या होत्या. यावर आ.क्षीरसागर यांनी मा.मुख्यमंत्री, मा.मुख्य सचिव यांच्याकडे जिल्हा भूमी अभिलेख विभागाची तक्रार केली आहे. तसेच महसूल विभागाकडे अतारांकित प्रश्न विचारला आहे.

भूमी अभिलेख विभागाच्या अधिनस्त मोजणी, हद्द कायम, पोटहिस्सा, बिगरशेत, भू–संपादन, गुंठेवारी, कोर्ट कमिशन, जमीन प्रदान तसेच कालावधी नियमित, तातडी, अतितातडी, अतिअतितातडी अशा व इतर निकषपात्र प्रकारच्या जमीन मोजणी व त्यासंबंधीत कार्यवाही असलेली सर्व कामे केली जातात. दरम्यान बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील बीड शहर, बीड तालुका व शिरूर का. तालुका तसेच जिल्ह्यातील शेतकरी व नागरिकांच्या, भूमी अभिलेख विभागाच्या कामकाजासंबंधी आ.संदीप क्षीरसागरांकडे अनेक तक्रारी आल्या होत्या. अधिकारी आणि कर्मचारी यांच्याकडून विभागासंबंधीत कामांसाठी जाणीवपूर्वक अडवणूक केली जाते, तसेच मोठ्या प्रमाणावर पैशांची मागणी केली जाते. अशा प्रकारच्या आ.क्षीरसागरांकडे शेतकरी व नागरिकांनी केल्या. यावर आ.संदीप क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री, मुख्य सचिव, विभागीय आयुक्त, जमाबंदी आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्याशी पत्रव्यवहार करून बीड जिल्हा भूमी अभिलेख विभागाची तक्रार केली आहे. तसेच अतारांकित प्रश्नाच्या माध्यमातून या विषयावर कार्यवाहीसाठी पाठपुरावा केला आहे. पान २ वर...

# वाजवा रे वाजवा!

ब्रि आमचे येथे श्रीकृपेकरून अमुक अमुक यांचे सुपुत्र आणि अमुक अमुक यांची सुकन्या यांचा शरीरसंबंध करण्याचे योजिले आहे. तरी मांडवशोभेसाठी आपण अवश्य यावे' अशी कोणे एके काळची आपल्या वाडवडिलांच्या लग्नाची इतकी थेट पत्रिका धनाजीरावांच्या डोळ्यासमोरून हलत नव्हती. शरीरसंबंध मांडवशोभा छ्या हे म्हणजे फारच झाले. लग्न म्हणजे स्वर्गात बांधल्या जाणाऱ्या पवित्र गाठी, त्या पृथ्वीवर येऊन पक्क्या करायच्या असतात. त्याआधी दोन्ही घराणी किती तोलामोलाची आहेत, हे पाहायचे असते. लग्न म्हणजे दागदागिने, कपडेलत्ते, मेजवान्या, भेटवस्तू, नाचगाणी, भेटीगाठी हेच त्यांना माहीत होते. आपल्या आजोबा-पणजोबांच्या जीवनात जरा म्हणून मनोरंजन नव्हते, म्हणून त्यांनी अशा थेट आणि रूक्ष पत्रिका लिहून लग्ने उरकली. आपण आपल्या धाकट्याच्या बाबतीत मात्र तसे अजिबात करायचे नाही, असे धनाजीरावांनी ठरवून टाकले होते. त्याला कारणही तसेच होते. हे कारण काय आणि हे धनाजीराव कोण म्हणून विचारता? अहो तेच ते. कोणे एके काळच्या आटपाट नगरातले. नाही समजले? पहिल्यापासून नीटच सांगायला हवे आहे म्हणता? चला तर मग काय झाले की पूर्वीच्या कहाण्यामध्ये असते तसे एक आटपाट नगर होते. तिथे धनाजीराव आणि सुंदराबाई हे जोडपे राहत होते. आणि हो, या आटपाट नगरात धनाजीरावांच्या गावीही नसलेले एक नानाजीपंतही होते. पण आपणही त्यांची फार दखल घेण्याची गरज नाही. तर असो, गाठीला बक्कळ पैसा जोडलेल्या धनाजीरावांना गावात चांगलाच मान होता. त्यांचे कुटुंबही खाऊनपिऊन सुखी होते. धनाजीरावांच्या दोन गुणी मुलांचे विवाह झाले होते आणि त्यांच्या कुटुंबात एक सुशील सून आणि जावयाची भर पडली होती. आता त्यांच्या शेंडेफळाचे लग्न होऊ घातले होते. धनाजीरावांच्या घरातले हे शेवटचे कार्य. त्यामुळे सगळ्या पंचक्रोशीत त्याची चर्चा झाली पाहिजे, 'आजवर असा विवाह पाहिला नाही,' असे लोकांनी म्हटले पाहिजे असे धनाजीरावांना वाटत होते. शिवाय त्यांच्या असेही लक्षात आले की त्यांच्याकडे असलेल्या संपत्तीच्या, त्यांच्या उत्पन्नाच्या तुलनेत आटपाट नगरात महागाई अगदीच किरकोळ होती. त्यामुळे मग धनाजीराव आणि सुंदराबाई यांनी हा समारंभ झोकात, अगदी हात सैल सोडून करायचे ठरवले. धनाजीरावांच्या घरच्या कार्यात अगदी तूप वाढण्यापासून प्रत्येक गोष्टीसाठी नाचानाच करणाऱ्या वऱ्हाडी मंडळींविषयी काय सांगावे? पंचक्रोशीमधली सगळी बडी बडी मंडळी सहकुटुंब झाडून हजर झाली होती. धनाजीरावांनी आपल्याला बोलावले, आपण त्यांच्या आमंत्रितांच्या यादीत आहोत, एवढ्या एका गोष्टीमुळेच आपण कृतकृत्य झालो आहोत, असे त्यांना वाटत होते आणि ते धनाजीरावांना जाणवावे असेच त्यांचे वागणे होते. एरवी आपल्याला कस्पटासमान लेखत आपल्यासमोर मोठा तोरा मिरवणारी, नाक वर करून चालणारी ही सगळी मंडळी धनाजीरावांसमोर कशी लीन होताहेत हे नानाजीपंत डोळे विस्फारून बघत होते. अर्थात गेल्या महिनाभरात कपडे असोत, धान्यधुन्य असो की औषधे असोत, या सगळ्यांच्या खरेदीसाठी गावात असलेल्या धनाजीपंतांच्या दुकानांमधले भाव ज्या वेगाने वाढले होते, त्यामुळे नानाजीपंतांचे डोळे यापेक्षाही जास्त विस्फारले गेले होते, ही गोष्ट वेगळी.अखेर धनाजीरावांच्या धाकट्या लेकाचे लग्न लागले. अगदी त्यांना आणि सुंदराबाईंना हवे होते तसे लागले. एवढा खर्च करूनही धनाजीरावांचा खिसा जडच राहिला. कारण तेवढी महागाईच नव्हती त्यांच्या जगात. आता त्या दोघांपुढे प्रचंड मोठे रिकामपण दाटून आले आहे. त्या रिकामपणाचे करायचे काय हा प्रश्न होम थिएटरवर साखरपुडा वा लग्नाची दृश्ये पाहून काही काळापुरता सुटेलही पण त्यानंतर काही ना काही समारंभ करावाच लागेल तोही वाजतगाजत तिकडे नानाजीपंतांनीही आता, भाच्याचे लग्नही इतक्याच थाटात करायचे असा हट्ट त्यांच्या बहिणीकडे धरला आहे म्हणतात.

# खनिजे वाहून नेण्यासाठी शक्तिपीठ महामार्ग?

शक्तिपीठ महामार्गासाठी १२ जिल्ह्यांच्या २७ हजार एकर जमिनी संपादित केल्या जाणार आहेत. तसेच ८६ हजार कोटी रुपये एवढा प्रस्तावित खर्च आहे. पाच वर्षांमध्ये तो पूर्ण करण्याचे लक्ष्य असले तरी त्याचा आवाका पाहता मुंबई गोवा महामार्गाप्रमाणे किमान दहा वर्षे लागू शकतात. म्हणजे याचा खर्च ८६ हजार कोटींपेक्षा दुप्पट तिप्पट होऊ शकतो. ज्या १२ जिल्ह्यांतून महामार्ग जाणार आहे, त्यातील बहुतांश जमिनी बागायती आहेत. त्यामुळे या पट्ट्यांमध्ये विरोध जास्त होताना दिसतो. या जमिनी आपोआपच बागायती बनलेल्या नाहीत. शेतकऱ्यांच्या मागील अनेक पिढ्या या शेतजमिनी बागायती करण्यासाठी झिजल्या आहेत. या बहुतांश जमिनी बागायत असल्या तरी त्याच्या उताऱ्यावर नोंदी जिरायती आहेत. भूमिलेख अधिकाऱ्यांनी या नोंदी करण्याकडे साफ दुर्लक्ष केलेले दिसते. शासनाने कायमच्या नापीक, पडीक जमिनींचा छोटे छोटे विशिष्ट प्रकल्प उभारण्यासाठी केला पाहिजे



आणि बागायती जमिनींची निवड टाळली पाहिजे. त्याचबरोबर आहे त्या रस्त्यांचे रुंदीकरण करून ते वापरावेत.केंद्र सरकारने भूसंपादन कायदा २०१३ संसदेमध्ये संमत केला. शेतकऱ्यांसाठी अनेक सकारात्मक गोष्टी या कायद्यामध्ये आहेत. हा कायदा होण्यापूर्वी शासनाकडून भूसंपादन हे ब्रिटिशांनी केलेल्या १८९४ च्या भूसंपादन कायद्यानुसार होत होते. या कायद्यावरच आधारित महाराष्ट्रातील १९५५ चा महाराष्ट्र राज्य महामार्ग कायदा आहे. महाराष्ट्रामध्ये राज्य सरकार जाणीवपूर्वक २०१३ चा कायदा डावलून १९५५ राज्यमार्ग कायद्यानुसार संपादन करते. महाराष्ट्र सरकारने ऑक्टोबर २०२१ आणि १४ जानेवारी रोजी काढलेल्या आदेशांनुसार, राष्ट्रीय आणि राज्य महामार्गांसाठी करण्यात येणाऱ्या भूसंपादनाच्या मोबदल्यात मोठी घट करण्यात आली आहे. पूर्वीच्या चौपट मोबदल्याऐवजी, आता दुप्पट मोबदला मिळणार आहे, तर जमिनीचे मूल्यांकन करताना 'रेडी रेकनर'मध्ये २० टक्के घट केली गेली.

यामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना प्रचंड फटका बसत आहे. प्रस्तावित शक्तिपीठ महामार्ग देखील याला अपवाद नाही. २०१३ च्या केंद्राच्या भूसंपादन कायद्यामध्ये अशा अनेक तरतुदी आहेत, ज्यामुळे शेतकरी व सरकार यांच्यामधील संघर्ष टाळला जाऊ शकतो. सर्वप्रथम महत्त्वाची गोष्ट म्हणजे शेतकऱ्यांची व ग्रामसभांची भूसंपादनासाठी संमती घेणे. दुसरी महत्त्वाची गोष्ट सामाजिक परिणामांचे मूल्यांकन व पर्यावरणीय मूल्यांकन, तिसरी गोष्ट प्रकल्प बाधितांच्या पुनर्वसनाची. त्यामध्ये त्या व्यक्तीचे घर, रोजगार व इतर घटकांचाही समावेश होतो. या कायद्यामध्ये पाच वर्षांच्या कालावधीत मोबदल्याची प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक आहे. तसे न झाल्यास जमीन संपादन आपोआपच रद्द होते.पश्चिम महाराष्ट्रात भूजल पातळी पृष्ठभागापासून कमी अंतरावर असते. असे महामार्ग बांधताना १५ फूटपर्यंत जमीन खोदली जाते. त्यामुळे भूजल पातळीवर विपरीत परिणाम होऊन त्याचे झरे बंद होतात. अनेक कालवे, नद्या, विहिरी, बोअरवेल यांवर परिणाम करतच हा महामार्ग जाणार आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये जी जलसिंचन सुविधा आहे त्या सर्वांच्या पाईपलाईनचे जाळे या गावागावांमध्ये पसरलेले आहे. या महामार्गाचे जाळे बांधताना ते तोडले जाऊ शकते. अनेक जणांच्या जमिनींच्या मध्यभागावरून हा रस्ता जाणार असल्याने त्यांच्या जमिनीचे रस्त्यामुळे दोन तुकडे पडतील. हे 'एक्सप्रेस वे' हे खरे तर 'बिझनेस वे' आहेत. हे धंदेवाईक मार्ग आहेत. या मार्गांच्या सभोवताली मोठे फूड पार्क, पेट्रोल पंप, वेगवेगळ्या ब्रँड्सची दुकाने उभी राहतात. यातून एका विशिष्ट श्रीमंत वर्गाचीच सोय होते. सर्वसामान्य लोकांना याचा काही उपयोग नसतो.



**परळी :** लातूर येथे लिंगायत आंदोलनातील इंजि.शशिकांत उरगुंडे यांची मुलगी श्रेया व प्रणव यांचा विवाह प्रसंगी शुभेच्छा देतांना भगवान साकसमुद्रे,शितल खाडे, संजय गायकवाड आदी.

# महिला अधिकारी भलतीच करामती

## पूजा खेकडर प्रकरण : एक एक कारनामे समोर

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

वादग्रस्त सनदी अधिकारी अशी ओळख झालेल्या पूजा खेडकर यांनी आता एक सवाल केला आहे. त्यांनी हा विचारलेला हा प्रश्नही चर्चेत आहे. पूजा खेडकर यांनी ट्रेनी सनदी अधिकारी असूनही त्यांनी स्वत:साठी केबीन मागितलं, तसंच खासगी कारवर अंबर दिवा लावला. एवढंच नाही दिव्यांग प्रमाणपत्र, उत्पन्न जास्त असतानाही नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्रामुळे त्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. या सगळ्याची दखल केंद्रानेही घेतली आहे. माध्यमांनी त्यांना गाठल्यानंतर मी तुमच्यासमोर बोलू शकत नाही असं त्या म्हणाल्या होत्या. आता त्यांनी माध्यमांनाच सवाल केला आहे. पूजा खेडकर प्रोबेशन कालावधीतही असतानाही अधिकारी असल्याच्या थाटात राहात होत्या. त्यांच्या सगळ्या




थाटाच्या सुरस कथा आता समोर येत आहेत. नियम असं सांगतो की खासगी कारवर महाराष्ट्र शासन अशी पाटी लावणं योग्य नाही. मात्र पूजा खेडकर यांनी त्यांच्या ऑडी कारवर महाराष्ट्र शासन असं स्टिकर लावलं होतं. तसंच खासगी कारला लाल आणि निळा दिवाही लावता येत नाही. तो दिवाही त्यांनी त्यांच्या ऑडी कारला लावला होता. खासगी कारला लाल-निळा दिवा लावून येणाऱ्या या अधिकारी कोण? अशी चर्चा पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात होत असे.

### मंत्रालय यांच्याकडे अहवाल

पूजा खेडकर यांचे वरिष्ठ मुंबईत आल्यानंतर पूजा खेडकर यांनी त्यांच्या वरिष्ठाचं चेंबर बळकावलं आणि तिथे स्वतःच्या नावाची पाटी लावली होती. तसंच वरिष्ठांच्या चेंबरमध्ये असलेलं सामान बाहेर काढलं होतं आणि तिथे आपलं सामान ठेवल होतं. या वर्तनाबाबत पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी अप्पर मुख्य सचिव मंत्रालय यांच्याकडे अहवाल दिला आहे.

# पान एक वरून

**शिवसंग्रामच्या रोजगार मेळाव्यात...**
उपक्रम राबवत राहू ऊसतोड मजुरांचा जिल्हा अशी ओळख असणाऱ्या बीडमध्ये या रोजगार मेळाव्याच्या रूपाने परिवर्तनाची नांदी शिवसंग्रामने केली आणि या अनोख्या उपक्रमने आज शेकडो तरुणांना चांगल्या कंपन्यांत रोजगार उपलब्ध झाला त्यामुळे सामाजिक बांधिलकी जोपासणारे शिवसंग्राम काल, आज आणि उद्याही असेच काम करत राहील असे मत या वेळी त्यांनी व्यक्त केले. यावेळी अजय जाहेर पाटील, प्रभाकर कोलंगडे, रमेश पोकळे, शेख शफीक, शेख निजाम, प्रमोद कुलकर्णी, नारायणराव काशीद यांनी क्रमशः आपले मनोगते व्यक्त केली. देशाची भावी पिढी असणाऱ्या युवकांसाठी एक स्तुत्य उपक्रम शिवसंग्रामणे आयोजित केला याबद्दल अजय जाहेर पाटील यांनी कौतुक केले या वर्षी पेक्षाही पुढील वर्षी शिवसंग्राम च्या वतीने आणखी भव्य मेळावा आयोजित केला जाईल असे मत शिवसंग्रामचे ज्येष्ठ नेते प्रभाकर कोलंगडे यांनी मत व्यक्त केले.स्वर्गीय विनायकराव मेटे यांनी सामाजिक कार्य करत असताना सामाजिक समतोल राखण्याचे काम केले. त्यांनी बीड मधील मंदिरांच्या विकासासोबतच शाहीनशावली दर्ग्याचा देखील विकास केला आणि त्याच पावलावर पाऊल ठेवत शिवसंग्राम ची वाटचाल सुरू आहे. असे मत शेख शफिक यांनी व्यक्त केले सामूहिक विवाह सोहळे व्यसनमुक्ती अभियान आणि अन्य सामाजिक उपक्रम राबवत आज या रोजगार मेळाव्याच्या अनुषंगाने युवकांच्या हाताला काम देण्याचे ध्येय शिवसंग्रामने आखले आहे त्याला आमच्या शुभेच्छा आहेत. असे मत रमेश पोकळे यांनी व्यक्त केले.युवकांच्या हाताला काम देण्यासाठी शिवसंग्राम पुढे आले याचा मनस्वी आनंद आहे असे मत शेख निजाम यांनी व्यक्त केले.

**भूमि अभिलेख विभागाकडून....**
पीआर कार्ड बाबतही केला अतारांकित प्रश्न : गेल्या काही वर्षांपासून बीड शहरात पीआर कार्डच्या बाबत गोंधळ आहे. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडे अनेक नागरिकांनी तक्रारी केल्या होत्या. यावर आ.क्षीरसागरांनी प्रशासकीय स्तरावर संबंधित अधिकार्यांच्या विरोधात कारवाई करण्याबाबत व सदरील प्रकार उघडकीस आणण्याबाबत पाठपुरावा केला होता. परंतु पीआर कार्डच्या विषयात अनेक तक्रारी असतानाही या अधिकार्यांनी संचिका गहाळ करणे, संबंधित कागदपत्राचे पुरावे नष्ट करणे, बोगस पीआर कार्ड तयार करणार्या खाजगी यंत्रणेशी हातमिळवणी करणे असे प्रकार केले आहेत. त्यामुळे नागरिकांची मोठी फसवणूक होत असल्याने आ.संदीप क्षीरसागर यांनी या मुद्द्यावरही महसूल मंत्रालयाकडे अतारांकित प्रश्नाद्वारे जाब विचारला आहे.

**वंचितचे जिल्हा कचेरीसमोरे** आंदोलन केले.आज बीडमध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस असल्याने व जिल्हाधिकारी कार्यालयात लेखनी बंद आंदोलन असल्याने सम्यकला आंदोलन आटोपते घ्यावे लागले. यावेळी ओबीसी नेते विष्णू दादा देवकते, सम्यकचे जिल्हाध्यक्ष रोहन मगर, प्रमोद निकाळजे, किरण वाघमारे, अजय सरवदे, लखन जोगदंड, सचिन मेघडंबर, मिलिंद सरपते, रोहन जोगदंड, रोहन लांडगे, कुणाल वारभुवन यांच्यासह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

**मारफळा येथे महिला....**
मिळून गेलो होतो शेत खुरपल्या नंतर दुपारी ४:३० वाजण्याच्या सुमारास अनिल गंगाधर राठोड, गंगाधर राठोड ही आले मागाले तुम्ही सर्व महिला माझ्याकडून ४८०० रु. गुते म्हणून घेतले होते परंतु इतक्या लवकर से कसे काय खुरपले असे म्हणून तुम्ही महा मंगाच्या बापा काम करण्याच्या लायकीच्या नाहीत अशी जातीवाचक शिवीगाळ करून इतर अनोळखी तीन पुरूष व एक महिला योनी चालक उमेश काळोबा साळवे यांचे गचुरे धरून खाली पडून लताबुक यांनी मारहाण करून शिवीगाळ केली व अनिल गंगाधर राठोड याने हातातील दगडाने मारहाण करून जखमी केले व म्हणाला इतक्या लवकर सेत खुरपलेले पैसे देणार नाही जर मला पैसे मागाल तर तुम्हाला जीवे मारू आशी धमकी दिली तिबेटापत चार महिलांचे गळ्यातील पोती पडल्या आहेत. यामुळे आम्हा सर्वांना त्याच्यापासून धोका आहे अशा आशयाच्या व इतरांवर भा.न्या.सं. ११८कलम (१), ११५, ३५२, ३१(२). १८९(२), १९१ (२), १९०, ३२४(४), ३(१)(२), ३(१)(२), ३(२) तलवाडा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून याचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरू तलवाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके हे करत आहेत.

# पान सहा वरून

**दिंद्रुडमध्ये सर्वांगसुंदर..**
कोल्हापूर येथील श्रीक्षेत्र कनेरी मठाचे प. पू. श्री अदृश्य काडसिध्देश्वर स्वामीजी यांचे यावेळी प्रवचन झाले. स्वामीजींनी आपल्या प्रवचनात भक्तीच्या विविध मार्गांचा उल्लेख करत सर्वांनी धर्माचे आचरण करण्याचा संदेश दिला. शेटे परिवार हा धार्मिक व लोकोपयोगी कार्यक्रमात नेहमीच योगदान देत असल्याचे ते म्हणाले. कोणत्याही मंदिराची उभारणी हे परम भाग्याचे काम असून अनेक पिढ्यानंतर पुण्यवान लोकांच्या हस्तेच मंदिराची उभारणी होत असल्याचे स्वामीजींनी आवर्जून सांगितले.

**केजमध्ये दारु साठा...**
ही केवळ चर्चाच आहे की, खरचं पोलीस कर्मचाऱ्याने उखळ पांढरे करून घेतले आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. वरीष्ठ अधिकाऱ्यांनी याबाबत अद्याप काहीच म्हटले नसल्याने नेमका प्रकार काय? याबाबत खुलासा करावा अशी मागणी करण्यात येत आहे.

**आषाढी एकादशीनिमित्त...**
नारायण गडाच्या वतीने देण्यात आले. याप्रसंगी श्री क्षेत्र संस्थान नारायण गडाचे विश्वस्त अनिलदादा जगताप, बळीराम गवते यांच्यासह सुनील अनभुले, दीपक काळे, नंदुकिशोर पिंगळे उपस्थित होते.

**सावकाराच्या जाचास...**
जिवे मारण्याची धमकी दिली होती. त्याच्याकडील बँकेचे पासबुक व एटीएम कार्ड देत नसल्याने घर खर्च भागवायचा कसा ? म्हणत घरात रडत बसला असताना त्याला आई व आजीने सावकार संजय गुंडविरुद्ध पोलिसात तक्रार देण्यास सांगितले. मात्र पोलिसात गेल्यास तो परत जास्त त्रास देईल, तो गुंड प्रवृत्तीचा आहे. त्याने बरेच लोकांना व्याजाचे पैशासाठी त्रास दिलेला आहे. म्हणून तो घाबरून गेला. शेवटी धम्मपाल मस्के याने सावकार संजय गुंड याच्या जाचास कटांळून त्याच्या भीतीपोटी ७ जुलै रोजी सकाळी त्याची बहीण दामिनी शंकर फंदे ही घरी जाऊन घरात आडूला गळफास घेऊन आत्महत्या केली. अशी तक्रार त्याची आई मंगल नंदकुमार मस्के यांनी दिल्यावरून सावकार संजय गुंड याच्याविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना हे पुढील तपास करीत आहेत.

**वारकऱ्यांसोबत पायी...**
वै.श्रीगुरु बंकट स्वामी महाराज संस्थानचे मठाधिपती ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्यासह विविध संस्थानचे मठाधिपती, महाराज, दिंडी प्रमुखांच्या भेटी घेऊन आशीर्वाद घेतले. तसेच, अखिल भारतीय वारकरी मंडळाचे बीड जिल्हाध्यक्ष ह.भ.प. हरिदास जोगदंड महाराज, ह.भ.प. नाना महाराज कदम आदींनी डॉ.योगेश क्षीरसागर यांचा सत्कार केला. खांद्यावर भगवी पताका घेऊन टाळ मृदंगाच्या निनादात अन् विठुरायाच्या जयघोषात तल्लीन डॉ.योगेश क्षीरसागर हे तल्लीन झाल्याचे पहायला मिळाले.

**बस बंद झाल्याने...**
कॉलेज करीता जाणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनी आणि गावातील वयस्कर तसेच आजारी माणसांच्या प्रवासाची मोठी समस्या निर्माण झाली आहे. खाजगी वाहन सेवा या मार्गावर उपलब्ध नाही आणि एखादं वाहन आरलेच तर त्याचे तिकीट न परवडणारे असते म्हणून प्रवाशांना मोठा फटाका बसत आहे. यावर संबंधित यंत्रणेने तातडीने दखल घेऊन आवश्यक ती कारवाई करणे आवश्यक आहे.

**'मुख्यमंत्री माझी लाडकी...**
यांच्या संपर्क कार्यालयात मोफत ऑनलाईन फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध केली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पुढील कागदपत्रे महिलांनी सोबत आणावेत. आधारकार्ड, बँक पासबुक, मतदान कार्ड, केशरी किंवा पिवळे राशन कार्ड, पासपोर्ट फोटो, असल्यास शाळेचा दाखला या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती घेऊन याव्यात. ही सुविधा सकाळी ११ ते ०५ यावेळेत सुरु राहील.

**गणराज नागरी सहकारी...**
विश्वासात घेतल्याने संतोष उपरे यांची दुसऱ्या वेळेस बिनविरोध अध्यक्ष पदासाठी निवड झाली आहे, तर उपाध्यक्षपदी रविंद्र दळवी यांची बिनविरोध निवड झाली तसेच यात बँकेचे ज्येष्ठ संचालक जव्हेरी राजेंद्रसिंग छगनसिंग, मा. ज्ञानोबा खांडे, मा. प्रा. पांडरंग चव्हाण, मा. अंकुश पतंगे, मा. रामचंद्र आमटे, ड उज्वला खेत्रे, मा. राम शिंदे, मा. अगंद घुमरे, मा. महेश बुध्ददेव, मा. सुनिल जगताप, श्रीमती निर्मला जाधव यांना नुकत्याच झालेल्या बँकेच्या निवडणुकीत बिनविरोध निवडुण दिले असुन आज दिनांक १५/०७/२०२४ रोजी मा. निवडणुक निर्णय अधिकारी कदम साहेब व सहाय्यक निवडणुक अधिकारी शाम जाधव साहेब यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बँकेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत बँकेच्या अध्यक्षपदी संतोष उपरे व उपाध्यक्षपदी रविंद्र दळवी यांची बिनविरोध निवड करण्यात आली असुन या निवडीबद्दल सर्व स्थरातुन श्री संतोष उपरे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

**शिवसेना शेतकरी...**
माध्यमातून परमेश्वर डाके यांनी काम करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी मुळूक, जगताप यांनी डाके यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख बांगर ताई, जायभय ताई, गोरे ताई,शरदा डोईजड यांची उपस्थित होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# सोयगाव,जरंडी मंडळात ढगफुटी सदृश

## अस्मानी : एकाच तासात सहा नद्यांना आला पूर

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील सोयगाव आणि जरंडी या दोन महसूल मंडळांना सोमवारी सकाळी अकरा वाजता मुसळधार ढगफुटी सदृश्य पावसाने एक तास तीस मिनिटे झोडपले या मध्ये या ढगफुटी सदृश पावसाने सोयगाव, फरदापुर,वरखेडी,(बु) जरंडी, निंबायती बहुलखेडा कवली या सात नद्यांना मोठे पूर आले होते वरखेडी बुद्रुक येथील पाझर तलावाच्या नालयात पुराच्या पाण्यात बैलगाडी वाहून गेल्या ने दोन बैलांचा पुरात वाहून मृत्यू झाल्याची घटना दुपारी एक वाजता घडली या प्रकरणी महसूल विभागाने घटनेचा पंचनामा केला आहे शेतकरी तुकाराम सरीचंद जाधव हे पाऊस उघडताच बैलगाडी घेवून घराकडे निघाले असता नाल्याच्या पुरात बैलासह गाडी वाहून गेली यामध्ये दोन बैलांचा पुरात बुडून मृत्यू झाला शेतकऱ्याचे एक लक्ष ७५ हजार रु चे नुकसान झाल्याचा पंचनामा तलाठी सुवर्णा गंगावणे यांनी केला



दरम्यान सोयगाव परिसरात झालेल्या पावसाच्या धुमशान मूळे सोयगाव च्य सोना नदीला पूर आला होता शहरात व परिसरात ढगफुटी सदृश पावसाने थैमान घातले दरम्यान जरंडी मंडळात झालेल्या ढगफुटी पावसाने जरंडीच्या खडकी नदीला पूर आल्या मुळे नदी काठावर असलेली तीन दुकाने पुराच्या पाण्यात बुडली होती जरंडी च्या बस स्थानकात नदीच्या पुराचे पाणी शिरले निंबायती गावाच्या नदीला पूर आल्या मुळे पुराचे पाणी निंबायती ग्रामपंचायत कार्यालयात शिरले होते पुराने सोयगाव चाळीसगाव रस्त्यावर बहुलखेडा व कवली येथील नाल्याना पूर आल्या मुळें सोयगाव ते बानोटी चाळीसगाव वाहतूक सायंकाळ पर्यंत ठप्प झाली होती दरम्यान सोयगाव, जरंडी ,निंबायती,बहुलखेडा, कवली फरदापुर वरखेडी आदी भागातील नद्यांना व नाल्यांना पूर आल्याचे चित्र होते दरम्यान सोयगाव च्या वेताळवाडी धरण क्षेत्रात मोठा पाऊस झाला आहे जरंडीच्या धिंगापूर धरण भागात मुसळधार पाऊस झाल्याने धिंगापूर धरणाच्या काठावर असलेल्या निंबायती धिंगापुर या गावांना तहसील प्रशासनाने सतर्कता आदेश दिले आहे धिंगापूर धरण रात्री कोणत्याही क्षणी ओव्हर फ्लो होण्याची शक्यता आहे त्यामुळे जरंडीत तालुका प्रशासन अलर्ट झाले आहे धरण भागात कोणीही जाऊ नये अशा सूचना नायब तहसीलदार गोरखनाथ सुरे यांनी दिल्या आहे.

# शालेय व्यवस्थापन समितीच्या निवडी

## अभिनंदनिय : अध्यक्षपदी येवले तर उपाध्यक्षपदी म्हस्के

पाटोदा/पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील डोंगरकिन्ही येथिल जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी गुण्याबापु येवले तर उपाध्यक्षपदी प्रमोद म्हस्के यांची बिनविरोध निवड झाली असुन शिक्षणप्रेमी नागरीक म्हणून माजी उपसरपंच नारायण बप्पा येवले यांची निवड करण्यात आली.



जि प माध्यमिक शाळा व्यवस्थापन समितीच्या निवडीसाठी शाळेच्या प्रांगणात बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकिच्या अध्यक्षपदी व्हा चेअरमन प्रभाकर येवले फौजी हेहोते.शाळेचे मुख्याध्यापक आदर्श शिक्षक बबनराव घायाळ सर यांनी प्रास्ताविक केले.याबैठकित उपस्थित असलेल्या पालकांनी साधक बाधक चर्चा करुन अध्यक्ष म्हणुन शाळेसाठी योगदान देतील असे पालक गुण्याबापु येवले यांची निवड करण्यात आली. तर उपाध्यक्ष म्हणून प्रमोद म्हस्के यांची बिनविरोध निवड केली.तर या समितीत सदस्य म्हणून बंडु मच्छिंद्र येवले, सुग्रीव लक्ष्मण येवले,बाबा सातपुते, योगेश येवले,नाना तुपे, बाळासाहेब साठे,रायते, ग्रामपंचायत सदस्यातुन संभाजी येवले,तर नारायण बप्पा येवले यांची शिक्षण प्रेमी नागरीक म्हणून निवड करण्यात आली.या पालकांच्या बैठकित मुख्याध्यापक घायाळ सर यांनी शाळेच्या काही भौतिक सुविधाचा अभाव व शिक्षकांची कमी असल्याने येणाऱ्या अडचणींवर उपाय करण्यासाठी मत नोंदवले.यावर नवनिर्वाचित समितीने शाळेच्या सर्व समस्या सोडविण्यासाठी भर देण्यात येणार आहे असे सांगितले.या बैठकीत अंकुश येवले, सुरेश वाल्हेकर, दादासाहेब येवले सह बहुसंख्येने पालकांची उपस्थिती होती.या प्रसंगी नवनिर्वाचित अध्यक्ष गुण्याबापु येवले व उपाध्यक्ष प्रमोद म्हस्के यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.तर आभार बबनराव घायाळ सर यांनी मानले.

## सत्कार...



**कडा:** खा.बजरंग सोनवणेंनी कडा येथे सदिच्छा भेट दिली असता, त्यांचा सत्कार करतांना छगण कर्डीले, अॅड, सुधीर सोनवणे आदी.

# वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्य वाटप

## नियोजन : श्रीकांत फड यांच्या माध्यमातून उपक्रम

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे दावतपूर येथील जि.प.प्रा. शाळेत राज्याचे कृषिमंत्री तथा पालकमंत्री मा.ना. धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच श्रीकांत भाऊ फड, प्रमुख पाहुणे म्हणून भास्कर बीडगर, तसेच प्रमुख वक्त्या शालेय पाठ्यपुस्तक अभ्यासक्रम निर्मिती मंडळाचा सदस्या जया इगे मॅडम, दावतपूर येथील पांडुरंग विद्यालयाच्या मुख्याध्यापिका आंधळे मॅडम यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचा प्रारंभ शिक्षणाच्या ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. प्रतिमापूजनानंतर प्रमुख पाहुण्यांचा विद्यार्थ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रमुख मान्यवरांचे स्वागत विद्यार्थ्यींनी केले कु. अक्षदा मुंडे ,स्नेहल खोडवे, अपूर्वा शिंदे, समीक्षा काचगुंडे, समीक्षा वेडे, आदिती काचगुंडे ,आकांशा गायकवाड यांनी केले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक जि.प.प्रा. शाळेचे मुख्याध्यापक कसबे सर यांनी केले. यानंतर प्रमुख वक्त्या श्रीमती जया इगे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. दरम्यान, विद्यार्थ्यांना बॅग वही ,पुस्तक, पेन आदी शैक्षणिक साहित्य मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. तसेच,ना. धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अंगणवाडी केंद्राचे लोकार्पण सरपंच श्रीकांत भाऊ फड तसेच इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.तसेच, मुख्यमंत्री लाडली बहिण , अनेक महिलांची आधार दुरुस्ती करण्यात आले .राज्याचे कृषिमंत्री मा.ना. धनंजय मुंडे यांच्या वाढदिवस अभिष्टचिंतन पर शालेय साहित्य वाटपाचे आयोजन दावतपूरचे सरपंच श्रीकांत भाऊ फड यांनी केले. तसेच त्यांच्या सर्व टीमने महादेव गडदे उपसरपंच व सर्व ग्रामपंचायत सदस्य आदींनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गरड प्रदीप चंद्रकांत यांनी केले. तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. दरम्यान महाराष्ट्रातील स्पोकन इंग्लिश ट्रेनिंग साठी अमेरिकेत जाण्यासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमानंतर अल्पोपहार देण्यात आला.यावेळी शाळेतील लहान मुलांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

# आज म्हाडाच्या योजनेची सोडत

औरंगाबाद/पुण्यभूमी प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे प्रधानमंत्री आवास योजना, २० टक्के सर्वसमावेशक योजना व म्हाडा गृहनिर्माण योजनेअंतर्गत १४९४ गाळे, सदनिका, निवासी भुखंडाकरिता फेब्रुवारी–२०२४ च्या जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन प्राप्त झालेल्या अर्जाच्या संगणकीय सोडतीचा शुभारंभ गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते १६ जुलै २०२४ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे.

या सोडतीचे थेट छायाचित्रण यु–ट्युब या समाजमाध्यमावर प्रक्षेपित होणार असून उपरोक्त सोडतीचे प्रक्षेपण पाहण्याकरीता यु–ट्युब या समाजमाध्यमाची ऑनलाइन लिंक अर्जदारांच्या भ्रमणध्वनीवर लघुसंदेशाद्वारे (ड्चड) स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल, असे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे मुख्य अधिकारी मंदार वैद्य यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

# जरंडी धरण शंभर टक्के भरले!

## निसर्ग : प्रशासनाने दिला सतर्कतेचा इशारा

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव परिसरात झालेल्या ढगफुटी सदृश पावसामुळे सोमवारी सायंकाळी सात वाजता जरंडीचे एकमेव धिंगापूर धरण शंभर टक्के भरले आहे तालुका प्रशासनाने रात्री साडेसात वाजता धरण भागाची पाहणी करून धरणाच्या काठावरील असलेल्या तीन गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे दरम्यान सोयगाव तालुक्यातील एकमेव जरंडीच्या धिंगापूर धरण रात्री उशीरा शंभर टक्के भरले असून कोणत्या ही क्षणी धरण ओव्हर फ्लो होऊन सुकी नदीला मोठ्या पूराची शक्यता वर्तविण्यात येत आहे त्यामुळे निंबायती तांडा निंबायती धिंगापूर या तीन गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे रात्रीतून धरण ओव्हर फ्लो होण्याची दाट शक्यता तालुका



प्रशासनाला आहे त्यामुळे सोमवारी रात्री उशीरा या धरण भागांची नायब तहसीलदार गोरखनाथ सुरे यांच्या सह पथकांनी पाहणी केली

**सोयगावच्या वेताळवाडी ची जल पातळी वाढली :** सोयगावच्या वेताळवाडी धरणात सोमवारी सायंकाळी ३० टक्क्यांनी जलसाठा वाढला असून या भागात पाण्याचा जोर कमी असल्याने वेताळवाडी भरले नाही त्या आधी जरंडीच्या धिंगापूर सर्वात पहिले तालुक्यातील एकमेव शंभर टक्के भरले आहे रात्री उशिरापर्यंत धिंगापूर धरण क्षेत्रात पावसाची रिपरिप सुरू झाली होती.

# पोस्टाकडून आकर्षक राखी लिफाफे!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

डाक विभागाकडून आकर्षक राखी लिफाफ` केवळ दहा रुपयात मिळणार आहेत. रक्षाबंधन सणासाठी ज्या बहिणीला भावाकडे अथवा भावाला बहिणीकडे प्रत्यक्ष जाता येत नाही म्हणून डाक विभागाने 'विशेष राखी कवरची ' सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे आकर्षक राखी कवर हे पोस्ट ऑफिसमध्ये प्रती नग केवळ १०/– रुपये या किमतीमध्ये उपलब्ध करून देत आहेत.

या कवरमध्ये राखी टाकून बहिणी आपल्या भावासाठी राखी पाठवू शकतात. जे भाऊ घराचा आर्थिक भार उचलण्यासाठी मोठ्या शहरात काम करतात, जे भाऊ सीमेवर राहून आपल्या देशाचे रक्षण करतात, जे भाऊ दुस–या राज्यात जाऊन मजूरी करतात, जे भाऊ मोठया शहरात व्यवसाय करतात अशा प्रकारे अनेक कारणांनी ज्या बहिणी भावाला भेटू शकत नाहीत त्यांच्यासाठी हा विशेष उपक्रम. तसेच आजच्या व्हटसप आणि ईमेल च्या काळात सर्वजन संदेश पाठवून किंवा व्हिडीओ कॉल करुन रक्षाबंधन साजरा करतात पण जर प्रत्यक्षात राखी देवून रक्षाबंधन साजरा करण्यात आला तर तो आनंद व्दिगुणीत होईल.

# आरोग्य केंद्रातील ईमारला गळती

## डॉ.गणेश ढवळे:जिल्हा आरोग्य प्रशासनास निवेदन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रात लिंबागणेश पंचक्रोशीतील १२ वाड्यातील गोरगरीब रुग्णांना आरोग्य सेवा पुरविणाऱ्या लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मुख्य इमारतीतील स्लॅब खराब झाला असुन पावसाळ्यात थेंब थेंब पाणी टपकत असुन इमारत पुर्णतः जीर्ण झालेली आहे. इमारतीच्या स्लॅब मधुन पावसाचे पाणी झिरपत असल्याने सध्या तपासणी कक्ष,बाळंतिनी कक्ष, बाह्य रुग्ण विभाग, मिटींग हॉल,आंतररुग्ण विभाग,औषधी विभाग, व्हरांडा याठिकाणी पावसाचे पाणी साचत आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात येत असलेल्या खेड्यापाड्यातील गोरगरीब गरजु रूग्णांची हेळसांड होत असुन तातडीने दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता




डॉ.गणेश ढवळे यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद बीड डॉ.सुहास गंडाळ आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड संगीतादेवी पाटील यांना निवेदनाद्वारे केली आहे. वार्षिक नियोजन निधीतून दुरुस्तीसाठी तरतूद करण्यात येईल असे आश्वासन डॉ. उल्हास गंडाळ यांनी दिले.

## सवाल : आ.नमीता मुंदडांचा मनमानी कारभार !

# दबाव तंत्राचा वापर योग्य का?

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघाच्या विद्यमान आमदार नमीता मुंदडा यांचा मनमानी कारभार सुरू असल्याने सर्वसामान्य नागरिकांना खुप मोठा त्रास सहन करावा लागत आहे.आमदार नमीता मुंदडा यांनी जनतेच्या लोकप्रतिनिधी म्हणून समस्या सोडवण्या ऐवजी समस्या वाढवणाऱ्या भुरट्या, भ्रष्टाचारी पहील्या आमदारा नमीता मुंदडा आहेत.आमदार नमीता मुंदडा यांना जनतेने आमदार केले आहे जनतेने आमदार नमीता मुंदडा यांना त्रास दिला पाहिजे व आमदारा नमीता मुंदडा सहन सुध्दा करावा लागतो परंतु केज अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघात उलट चालेल आहे आमदारा नमीता मुंदडा त्रास जनतेला देतात व जनता सहन



करते एवढ्या नालायक पनाचा कळस असणाऱ्या आमदारा नमीता मुंदडा आहेत यांना आमदारा म्हणण्याची सुध्दा लाज वाटते असे चर्चा नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.तसेच केज तालुक्यात सोशल मीडिया पोस्ट आढळुन येते आहेत की एका समाजाच्या पत्रकारांने आमदारा नमीता मुंदडा यांनी ओबीसी आरक्षणा बाबत भुमीका पस्ट करत नाहीत तोपर्यंत आमदारा नमीता मुंदडा यांनी लाडकी बहिण योजनाचे बॅनर फाडण्यात येतील अशी पोस्ट सोशल मीडिया वर व्हारल केली असतान आमदारा नमीता मुंदडा यांनी बॅनरबाजी केली व काही गावांमध्ये बॅनर फाडण्यात आले त्यांची पोस्ट एका विषीष्ठ समाजाच्या पत्रकारांने केली व पोस्ट का केली म्हणून विधानसभा लोकप्रतिनिधी पोलिस प्रशासनाला गुन्हा दाखल करण्यासाठी दबाव टाकल्याच्या पोस्ट सुध्दा सोशल मीडिया वर व्हारल होताना दिसत आहेत मग केज विधानसभा लोकप्रतिनिधी म्हटल्यावर आमदारा नमीता यांचे नाव पुढे येते जर ऐखादा पत्रकार किंवा नागरिक जर भुरट्या आमदारा नमीता मुंदडा यांच्या विरोधात बोलल्यास भ्राष्टचारी आमदारा नमीता मुंदडा पोलिस प्रशासनाला दबाव तंत्रात घेऊन सर्वसामान्य नागरिकांन वर पत्रकारांनवर आ.नमीता मुंदडा गुन्हा दाखल करण्याचे सत्र आमदारा नमीता मुंदडा यांनी सुरू केले आहे तरी विद्यमान आमदार नमीता मुंदडा यांचा मनमानी कारभार बंद कधी होणार असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले व केज तालुक्यातील जनता आमदारा नमीता मुंदडा यांच्या त्रासाला कंटाळून एखाद्या वेळेस जास्त त्रस्त झालेली व्यक्ती आत्महत्या सुध्दा करेल ऐवढा त्रास आमदारा नमीता मुंदडा यांनी केज तालुक्यातील जनतेला देत आहेत अशा भावना नागरिकांन मधुन व्यक्त केल्या जात आहेत.

# बीडच्या बार्शी नाका चौकात जल्लोष

## आनंद : ओबीसी समाजाचा विजय

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोकनेत्या पंकजा मुंडे यांचा विधान परिषदेवर विजय झालेल्या कार्यकर्त्यामध्ये व सर्वसामान्य मध्ये आनंदाचे उत्साहाचे वातावरण झाले. लोकसभेमध्ये झालेले निसटता पराभवामुळे खचून न जाता भारतीय जनता पार्टीने पंकजा मुंडे यांच्याकडे जबाबदारी सोपवण्यासाठी विधान परिषदेची उमेदवारी देऊन दणदणीत विजय मिळवून दिल्याने बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील ओबीसी समाजात समाधान व आनंद व्यक्त केला जात आहे.पंकजाताई कडे गेली पाच वर्षांपासून जबाबदारीचे पद नसल्यामुळ जिल्हाच्या विकासाला न्याय देता आला नाही.पंकजाताई विधान परिषदेच्या आमदार म्हणून निवड झाल्याने महाराष्ट्रसह बीड



जिल्ह्याच्या विकास कामाला पुन्हा गती मिळणार असून रेल्वे सह अनेक प्रश्न मार्गी लागणार आहेत. आजच्या विजयामुळे भाजपा

कार्यकर्त्याला निश्चितपणे ऊर्जा मिळनारी असून पंकजाताई चा विजय तर आहेच त्यासोबत हा ओबीसी समाजाचा विजय असून समाजाला न्याय देणारा विजय आहे.आज या विजयाचा आनंदोत्सव बार्शी नाका चौकामध्ये फटाके फोडूनपंकजाताई तुम आगे बढो हम तुम्हारे साथ हैअश्या घोषणा देत कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला.यावेळी नामदेव दुधाळ,राजाभाऊ दुधाळ,नितीन पुंड,अशोक दुधाळ, ज्ञानेश्वर राऊत,प्रीतम दुधाळ,दीपक पवार,आकाश ढगे,सुशील दुधाळ,दीपक भराटे,सौरभ राऊत,अमर बंडगर,नवनाथ भराटे,रवी दुधाळ,राहुल भराटे,नितीन शेवाळे,दत्ता राऊत,गोपाळ आखाडे सह युवकांनी वर्ष नगर चौकात आनंद उत्सव साजरा केला.

# शेकापचा पराभव

महाराष्ट्र राज्य विधान परिषद निवडणुकीत विधान परिषद निवडणुकींना अपरंपार महत्त्व आले. यातील ११ पैकी ९ जागा महायुतीने, तर महाविकास आघाडीने २ जागा जिंकल्या. शेकापचे नेते जयंत पाटील हे या निवडणुकीत पराभूत झाले. प्रथमच ते या निवडणुकीत पराभूत झाले आहे. त्याबरोबरच शेकापचे विधान परिषदेतील अस्तित्व संपले. एकेकाळी प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या शेकापचा एकही उमेदवार विधान परिषदेत असणार नाही. महायुतीला आपले सर्व उमेदवार निवडून आणण्याच यश मिळाले; पण या निवडणुकीत खरा धोक्याचा इशारा मिळाला आहे, तो महाविकास आघाडीला.

शेकापचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील हे गेल्या २४ वर्षांपासून विधान परिषदेवर होते. पण आता त्यांचे अस्तित्व संपले आहे. राजकारणात काँग्रेसला टक्कर देणारा शेकाप हा एकमेव पक्ष होता. प्रमुख विरोधी पक्ष होता; पण आता त्याची ताकद क्षीण होत कमी झाली आहे. आता तर तो नामशेषच झाला. शेकापचे तीन ते चार आमदार निवडून येत. आता तीही संख्या घटली आहे.

शरद पवार गटाचे १२ आमदार वगळता अन्य पक्षांची मते घेण्यात त्यांना अपयश आले. शरद पवार यांनी ठरवले असते, तर शेकापला मदत करू शकले असते; पण त्यांनी तसे केले नाही, अशी चर्चा आहे. शरद पवार यांनी हे का केले, हे कधीच समोर येणार नाही. जयंत पाटील हे शेकापचे एकमेव आमदार आहेत. त्यांना पहिल्या पसंतीची २३ मते हवी होती. त्यामुळे ते महाविकास आघाडीवरच संपूर्णपणे अवलंबून होते; पण त्यांना कुणी दगा दिला, हे माहीत नाही, त्यांना मते मिळू शकली नाहीत. काँग्रेसकडून अतिरिक्त मते मिळतील, अशी आशा त्यांना होती; पण काँग्रेस आणि जयंत पाटील यांच्या शेकापचे पूर्वापार वैर चालत आले आहे. त्यावरून काँग्रेस आपल्याकडील अतिरिक्त मते त्यांना देतील, ही आशाच नव्हती. तसेच घडले आणि जयंत पाटील अतिरिक्त मतांचा कोटा मिळवण्यात अपयशी ठरले.

पण मिलिंद नार्वेकर यांची उमेदवारी ही शिवसेना पक्षातर्फे सर्वात महत्त्वाची ठरली. त्यांच्यामुळेच शेकापचा पराभव झाला. नार्वेकर जिंकून यायचे असतील, तर जयंत पाटील यांना पराभूत व्हावेच लागणार होते. रायगड, रत्नागिरी आणि मावळच्या जागेचा निम्मा भाग कोकण पट्ट्यात येतो. या तिन्ही जागा कोकण पट्ट्यात येतात. यापैकी दोन जागांवर महायुतीने निर्विवाद जागा जिंकल्या आहेत. विधान परिषद निवडणुकीत गुप्त मतदान पद्धत असल्याने, कुपणावरचे आमदार अन्य पक्षांना साथ देण्याची शक्यता असते. तसेच येथेही घडले आणि गुप्त मतदान पद्धत असल्याने काँग्रेसची मते फुटली, असे बोलले जाते. कोण फुटू शकते, याची कल्पना पक्षाच्या नेत्यांना असली, तरीही त्यांना तातडीने काही करता येत नाही. काँग्रेसच्या फुटलेल्या सहापैकी चार आमदार आता इतर पक्षात जाण्याच्या तयारीत असल्याचे बोलले जाते. या निवडणुकीच्या निमित्ताने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या पक्षाला एकसंध राहण्यात यश मिळवले, असे बोलले जाते. या निवडणुकीपूर्वी आपल्या आमदारांमध्ये चलबिचल असल्याचे बोलले जात होते; पण त्यांनी आपला पक्ष एकसंध असल्याचे दाखवून दिले. जयंत पाटील यांचा पराभव वगळला, तर या निवडणुकीत सर्व अपेक्षेप्रमाणे निकाल लागले.

जयंत पाटील यांनी गेल्या अनेक वर्षांत जे नाव मिळवले होते आणि जो दबदबा निर्माण केला होता, तो आता नष्ट झाला आहे. महायुतीला या निवडणुकीने दिलासा मिळाला आहे. या निवडणुकीत महायुतीचे सर्व उमेदवार निवडून आल्याने, विधानसभा निवडणुकीत काय होईल, याचा अनुभव आला आहे. देवेंद्र फडणवीस यांचे फ्लोअर मॅनेजमेंटचे कौशल्य या निवडणुकीतून दिसले. आहे. काँग्रेससाठी मात्र हा निकाल हा धक्का आहे. काँग्रेसच्या जागा लोकसभा निवडणुकीत चांगल्याच वाढल्या होत्या. त्यात ९९ पर्यंत गेल्या होत्या. काँग्रेससाठी हा मोठा धक्का आहे. हा निकाल हा लोकसभेसारख मताचा कौल नसला, तरीही लोकांच्या मतांच्या अंदाज येतो. आता सर्वच पक्षांना या निवडणुकीच्या निकालानंतर आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. आपल्या पुढील वाटचालीसाठी निकाल कसा परिणाम करतो, हे समजण्यासाठी या निकालाचा निश्चितच उपयोग होतो. त्या दृष्टीने या निकालाचा भविष्यात परिणाम काय होणार आहे, याचा उपयोग होणार आहे. सध्या तरी या निवडणुकीत महायुती सरस ठरली आहे. पण या निवडणुकीत आता जयंत पाटील यांच्या रूपाने शेकापचा बुलंद नेता गर्जणार नाही. जयंत पाटील यांना जिंकून आणण्याचे शरद पवारांनी मनावर घेतले नाही, असे बोलले जाते.

अनेकांनी शरद पवारांना सांगितले होते. असे म्हणतात की, त्यांनी जयंत पाटील यांना निवडून आणावे; पण पवारांनी तसे केले नाही. परिणामी पवारांना आपला हा एकेकाळचा लाडका नेता निवडून आणता आला नाही; पण तिकडे शिवसेनेच्या मिलिंद नार्वेकरांना ठाकरे यांना निवडून आणावे लागले. यात पाटील यांचा पराभव झाला. या साऱ्या राजकारणात एका बुलंद पक्ष आता महाराष्ट्र विधानसभेत दिसणार नाही. शेकापचे विधिमंडळातील अस्तित्व संपुष्टात आले. या निवडणुकीने महायुतीला दिलासा मिळाला असला, तरीही इतर पक्षांना एक धोक्याचा इशारा आहे.



# पुनःपुन्हा मुंबईची तुंबई का होते?

## मुंबई डॉट कॉम

**अल्पेश म्हात्रे**

मुंबईसाठी मुसळधार पाऊस आणि अतिवृष्टी ही काही नवीन नाही. परंतु गेल्या आठवड्यात अधिवेशन सुरू असताना विधान परिषद आणि विधानसभेच कामकाज स्थगित करावे लागले, तर कित्येक आमदारांना मुंबईत आल्यावर अधिवेशनात पोहोचण्यासाठी ४ ते ५ तास लागले, तर सुट्टीच्या दिवशी गावी गेलेले कित्येक आमदार रेल्वे गाड्यांमध्येच अडकल्याने, रेल्वेतच अडकून पडले. एरवी सर्वसामान्य जनतेला त्रास सहन करावा लागतो. मात्र यंदा आमदारांना त्याची झळ पोहोचल्याने, ही चर्चेची गोष्ट ठरली. सरकारने मुंबई महापालिकेच्या माध्यमातून १०० टक्के नालेसफाईचे काम पूर्ण झाल्याची घोषणा राज्य सरकारने केली होती; पण परिस्थिती जर बघितली, तर मुंबईची तुंबई झाली होती. कित्येक जणांच्या जीवाला धोका निर्माण झाला होता. मुंबईची तुंबई कशी आणि कोणी केली, याला जबाबदार कोण, हा सवाल अधिवेशनात चांगलाच गाजला .

मुंबईसह ठाणे, पालघर व आजूबाजूच्या जिल्ह्यांना रविवारी मध्यरात्रीपासूनच मुसळधार पावसाने झोडपून काढले होते. यामुळे सोमवारी सकाळपासूनच नोकरदारवर्गासह घराबाहेर पडलेल्या प्रत्येकाचे प्रचंड हाल झाले. मध्य रेल्वे ठप्प झाली, तर पश्चिम रेल्वे उशिराने धावत असल्यामुळे, स्थानकांवर प्रचंड गर्दी झाली. काही स्थानकांच्या फलाटांवरून पाणी गेले. याचा फटका हजारो लोकांना बसला. अनेक आमदार हे एक्स्प्रेसमध्ये अडकले होते. त्यामुळे विभानसभा आणि विधान परिषदेचे कामकाज स्थगित करावे लागले होते. मागच्या काळात शिवसेनेची सत्ता असताना शिवसेनेवर आरोप व्हायचे की, मुंबईची तुंबई झाली. शिवसेनेच्या ताब्यात महानगरपालिका होती म्हणून आरोप होत होते; पण आता सगळ्या अधिकाऱ्यांनी, प्रशासनाने, राज्याच्या मंत्र्यांनी, पालकमंत्र्यांनी आणि मुख्यमंत्र्यांनी घोषणा करताना सांगितले की, १०० टक्के नालेसफाई झाली आहे. सगळ्यांनी जाऊन लाल लाल गालीचे टाकून नाल्याची आणि साफसफाईची पाहणी केली. कोट्यवधी रुपये कंत्राटदारावर खर्च केले गेले; पण दोन दिवसांची परिस्थिती पाहिली, तर कोट्यवधी रुपये खर्च करूनही, ज्या नियोजनाची आवश्यकता होती, ते नियोजन केलेले दिसले नाही .

**कोट्यवधीचा खर्च करून कंत्राटदारांनी नेमके काय काम केले?**

मुंबईचे जीवन अस्ताव्यस्त होणे म्हणजे महाराष्ट्राचे जीवन अस्ताव्यस्त होणे आहे. रेल्वे आणि बस उशिरा सुरू असल्याने कामकाज थांबले होते. शाळा, महाविद्यालयांनासुद्धा सुट्टी द्यावी लागली. त्यामुळे आता प्रश्न पडतो की, करोडोचा जो खर्च झाला तो नेमका कशावर झाला? मुंबईमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी तुंबलेले नाले स्वच्छ करण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांवर लक्ष दिले होते का? संबंधित अधिकारी जागेवर होते का? त्यांनी नीट काम केले होते का, कंत्राटदारांनी नेमके काय काम केले,

नालेसफाईची श्वेतपत्रिका काढण्याची विरोधकांनी मागणी केली. विधानसभेत भाजप नेते आशीष शेलार यांनीसुद्धा अशाच पद्धतीची मागणी केली. जर प्रशासन सांगत असेल १०० टक्के काम झालेले आहे, तर मग अशा ही स्थिती का निर्माण झाली? त्यामुळे नालेसफाई कोणत्या कंत्राटदारांनी केली, पाणी का तुंबले याबाबत श्वेतपत्रिका सरकारने काढण्याची मागणी केली. मात्र मुंबईत पूरक परिस्थिती निर्माण होते, याचे पूर्ण खापर प्रशासनावर न फोडता, मुंबईकरांवरही त्याची जबाबदारी येते. पालिकेने कोट्यवधी रुपये खर्चून उपाय केले, तरी पाण्याचा निचरा होत नाही. याचे कारण अतिवृष्टी असल्याचे पालिका प्रशासनातर्फे सांगितले जाते. मात्र पाणी साचणे, हा एक प्रकारे फसलेल्या नियोजनाचाही परिणाम आहे. कोणत्याही प्रकल्पाचे, इमारतींच्या बांधकामाचे नियोजन पावसाचा, पाणी तुंबण्याचा, पूररेषेचा विचार करूनच होणे आवश्यक आहे. मात्र त्याचा फारसा विचार झालेला नाही. अनेकदा पर्जन्यजल वाहिन्यांची कामे करताना, वाहिन्यांचा उतार कमी ठेवला, तर कधी पर्जन्यजल वाहिनीत झाडांची मुळे पसरली, कधी सिमेंटच्या गोण्या अडकल्यामुळे पाण्याचा निचरा होण्यात अडचणी निर्माण होतात. पाणी वाहून नेणाऱ्या वाहिन्यांमध्ये कचरा साठतो, त्यामुळे कोट्यवधींचे प्रयोग फसल्याचे आढळते. मोठ्या प्रमाणावर शहरीकरण झाल्यामुळे व बेशिस्त मुंबईकरांमुळे मुंबईला पुराचा धोका कायम आहे.

मुंबईत वार्षिक अडीच हजार मिमी पाऊस पडतो. त्यापैकी सर्वाधिक पाऊस जुलै आणि ऑगस्टमध्ये पडतो. त्यातही मोजके काही दिवस मुसळधार, कमी कालावधीत खूप पाऊस पडतो आणि पाणी साचते. पावसाचे दोनच महिने पर्जन्यजल वाहिन्या वाहत असतात. इतर वेळी त्या कोरड्या असतात. मग लोक त्यात कचरा टाकतात. चार दिवसांसाठी एवढा खर्च करावा का, असा प्रश्न आता उपस्थित होऊ लागला आहे. मात्र एकदा, दोनदा पूर आला तरी त्याचा फटका सर्वसामान्यांना, गरीब वर्गाला अधिक बसतो. त्यांचा रोजगार बुडतो. शहराचे नुकसान होते. मुंबई हे शहर समुद्राने वेढलेले आहे. बशीसारखा खोलगट आकार असल्यामुळे मुंबईत अनेक भाग सखल असून, तेथे पावसाळ्यात पाणी साचते. पावसाचे पाणी वाहून समुद्रात जाते. मात्र अतिवृष्टी होत असताना, समुद्राला भरती आली, तर साचलेल्या पाण्याचा निचरा होत नाही. पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी, मुंबईत असलेली पर्जन्यजल वाहिन्यांची यंत्रणा ही ब्रिटिशकालीन असून, त्याची क्षमता ताशी ५० मिमी पाऊस पडल्यास, तेवढ्या पाण्याचा निचरा करणारी आहे. तसेच पावसाचे पाणी समुद्रात सोडण्यासाठी सध्या असलेली ब्रिटिशकालीन पातमुखे ही समुद्रसपाटीपेक्षा खाली आहेत. त्यामुळे भरतीच्या वेळी अतिवृष्टी झाल्यास, पावसाच्या पाण्याचा निचरा होत नाहीच; पण समुद्राचे पाणी शहरात शिरते. त्यामुळे मुंबईत पूरसदृश स्थिती निर्माण होते. त्यातही जे भाग अधिक सखल आहेत, अशा ठिकाणी साचलेल्या पाण्याची पातळी अधिक असते. पावसामुळे मुंबईची दैना झाल्यावर नेहमीप्रमाणे दोषारोपांची मालिका सुरू होते. सत्ताधारी व विरोधक एकमेकांवर आरोपांच्या फैऱ्या झाडू लागतात. मोठ्या पावसाने मुंबईची दैना झाली, याला जबाबदार कोण, यावर राजकारण सुरू होते; पण मोठ्या पावसानंतर मुंबईची दैना का होते, पाऊस वाढला की मुंबईची तुंबई का होते? या प्रश्नाकडे मात्र सर्वच पक्ष सोयीस्कररीत्या डोळेझाक करीत आहेत. २६ जुलै २००५च्या पावसानंतर शासन प्रशासन आणि नागरिकांनी कोणताच धडा घेतलेला नाही म्हणूनच ही वेळ पुनःपुन्हा येत आहे. पूर्वी मुंबईत मोकळ्या जागा असायच्या, त्यामुळे तिथे पाण्याचा निचरा व्हायचा; पण आता मुंबईत मोकळ्या जागाच राहिला नाहीत. विकासाच्या नावाखाली मुंबई सिमेंटचे जंगल बनत चालले आहे. मुंबईतील रस्ते सिमेंटचे आणि पेवर ब्लॉकचे बनले आहे, त्यामुळे पाणी मुरायला मुंबईत जागाच नसते, त्यात मोठा पाऊस आणि भरती एकाच वेळी आली, तर ते सर्व पाणी नागरी वस्तीतच शिरते. मुंबई तुंबण्याचे आणखी एक कारण म्हणजे प्लास्टिक. राज्य सरकारने प्लास्टिक वर बंदी घातली असली, तरी मुंबईत दररोज हजारो टन प्लास्टिक कचरा जमा होतो. या प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात प्रशासन अजूनही अपयशी ठरत आहे, हे प्लास्टिक नदी-नाल्यांमध्ये अडकल्याने, तेथून पावसाचे पाणी वाहून जाण्यास अडचण निर्माण होते. राज्य सरकारने प्लास्टिक वर घातलेली बंदी किती योग्य आहे? या पावसामुळे तरी नागरिकांना समजेल. नागरिकांनी प्लास्टिकचा वापर टाळायला हवा. या सोबतच नागरिकांनी वाटेल, तिथे कचरा टाकायची सवय मोडायला हवी. ग्लोबल वॉर्मिंगमुळे दर वर्षी मुंबईच्या समुद्र पातळीतही वाढ होत आहे. आता तरी या सर्व परिस्थितीचा विचार करता मुंबई व मोठ्या शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार होणे गरजेचे आहे . जल व्यवस्थापनाची आजची पद्धत बदलून, नवीन पद्धतीचा अवलंब करायला हवा, त्यासाठी उच्च तंत्रज्ञान वापरायला हवे. त्यासाठी परदेशातील तज्ज्ञांची मदत घ्यायला हवी व सुधारणा करायला हवी नाही, तर मुंबईकरांचे आयुष्य पुन्हा राम भरोसेच असेल...!

# खास महिलांसाठी... मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना

**वर्षा फडके-आंधळे**
**(वरिष्ठ सहायक संचालक)**

महाराष्ट्रातील माता-भगिनी आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर व्हाव्यात, यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील महिलांच्या आरोग्य आणि पोषणाची हमी घेणार आहे. राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी 'माझी लाडकी बहीण योजना' सुरू करण्यात आली आहे. राज्यातील महिला व मुलींना सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबर रोजगार निर्मितीस चालना देणे, महिलांचे आर्थिक-सामाजिक पुनर्वसन करणे, राज्यातील महिलांना व मुलींना सशक्तीकरणास चालना देणे, महिला व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या मुलांच्या आरोग्य आणि पोषण स्थितीत सुधारण करणे या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेसाठी १ जुलै ते ३१ ऑगस्ट २००२४ पर्यंत अर्ज करण्याची मुदत देण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत प्रत्येक पात्र राहिलेल्या तिच्या स्वतःच्या आधार लिंक केलेल्या थेट लाभ हस्तांतरण सक्षम बँक खात्यात दर महिन्याला १५०० रूपये दिले जाणार आहे. तसेच केंद्र/राज्य शासनाच्या अन्य आर्थिक लाभाच्या योजनेद्वारे १५०० पेक्षा कमी लाभ घेत असेल, तर फरकाची रक्कम या योजनेद्वारे पात्र महिलेस देण्यात येणार आहे. याचाच अर्थ त्या महिलेला १ वर्षाचा १८ हजार रुपये मिळणार आहे.

या योजनेचा लाभ राज्यभरातील अधिकाधिक महिलांना घेता यावा, यादृष्टीने आपल्या शासनाने अनेक अटी शिथिल करत, या योजनेची प्रक्रिया अधिक सुलभ केली आहे. या योजनेअंतर्गत आता २१ ते ६५ या वयोगटातील विवाहित, विधवा, घटस्फोटित, परितक्त्या आणि निराधार महिलांना तसेच कुटुंबातील एका अविवाहित महिलेला दरमहा १५०० रुपये दिले जाणार आहेत. यामुळे राज्यातील अनेक महिलांना या योजनेचा लाभ घेता येईल. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज ऑनलाइन पद्धतीने भरायचा आहे. जिथे अशक्य आहे, तिथे ऑफलाइन अंगणवाडी सेविका, सेतू सुविधा केंद्रात अर्ज जमा करता



येईल आणि हो घरच्या घरी मोबाइलवरूनही ऑनलाइन अर्ज भरता येईल.

**या योजनेचे लाभार्थी कोण असतील?**

- लाभार्थी महिलांचा वयोगट २१ ते ६५ वर्षे.
- विकसित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या आणि निराधार महिला.

**योजनेच्या लाभार्थ्यांची पात्रता**

- लाभार्थी महिला महाराष्ट्राची रहिवासी असणे आवश्यक.
- लाभार्थी महिलेच्या बँक खाते असणे आवश्यक.
- लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे
- पिवळे व केशरी रेशनकार्ड असल्यास उत्पन्न दाखला प्रमाणपत्रातून सूट देण्यात आली आहे.
- एकाच कुटुंबातील दोन महिलांना लाभ मिळू शकतो. १ विवाहित आणि १ अविवाहित महिला असल्यास दोघींनाही लाभ मिळू शकतो .
- योजनेचा लाभ मिळण्यासाठी अधिवास प्रमापत्र नसल्यास १५ वर्षांपूर्वीचे रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, जन्मदाखला यांपैकी ग्राह्य धरण्यात येणार आहे.
- परराज्यात जन्म झालेल्या महिलांनी महाराष्ट्रातील पुरुषाबरोबर विवाह केला असल्यास पतीचा जन्म दाखला, शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र किंवा अधिवास प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार आहे.

**या योजनेचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक कागदपत्रे**

- योजनेच्या लाभासाठी ऑनलाईन अर्ज.
- लाभार्थी महिलेचे आधार कार्ड.
- महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र/महाराष्ट्रातील जन्मदाखला.
- सक्षम पाधिकारी यांनी दिलेला कुटुंबप्रमुखाचा उत्पनाचा दाखला.
- बँक खाते पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत.
- पासपोर्ट साईजचा फोटो.
- रेशन कार्ड.
- सदर योजनेच्या अटी-शर्तींचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र.

**या योजनेत अर्ज कसा करता येईल ?**

- ज्या महिलेस ऑनलाइन अर्ज करता येत नसेल, त्याच्यासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया अंगणवाडी केंद्रात/बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालये/ग्रामपंचायत/वॉर्ड/सेतू सुविधा केंद्रे येथे उपलब्ध आहे.
- अंगणवाडी सेविका / पर्यवेक्षिका / मुख्यसेविका/ सेतू सुविधा केंद्र / ग्रामपंचायत / ग्रामसेवक/ वार्ड अधिकारी यांनी ऑनलाइन प्रस्तावित केल्यावर लाभार्थी महिलेचा अर्ज सक्षम अधिकारी यांच्याकडे सादर करता येईल
- अर्ज करण्याची प्रक्रिया विनामूल्य आहे.
- अर्जदार महिलेने स्वतः अर्ज करताना उपस्थित राहणे आवश्यक आहे. जेणेकरून तिचा थेट फोटो काढता येईल आणि ई- केवायसी करता येईल.
- महाराष्ट्रातील आर्थिक दुर्बल घटकांसोबत सर्व प्रवर्गातील महिलांसाठी राज्य शासन पाठीशी उभे आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अंमलात असून, महिलांना आर्थिक आधार देण्यात येत आहे.

## राशिभविष्य

सोमवार, १५ जुलै २०२४

### || पंचांग ||

आजमिती आषाढ शुद्ध नवमी शके १९४६, चंद्र नक्षत्र स्वाती, योग सिद्ध चंद्र राशी तुळ. सोमवार, दि. १५ जुलै २०२४ सूर्योदय ०६.२८., सूर्यास्त ०७.१९., चंद्रोदय ०१.४८., चंद्रास्त ०१.१८., उद्याचा राहू काळ ०७.४८ ते ०९.२६. पुनर्यात्रा.

### || भविष्य ||

**मेष** : आध्यात्मिक क्षेत्रांमध्ये रस घेणार आहात.

**वृषभ** : आज अत्यंत आनंददायी वेळ आहे.

**मिथुन** : आपला आत्मविश्वास भरपूर असणार आहे.

**कर्क** : नवीन प्रकल्प हाती घ्याल.

**सिंह** : लोकप्रियता मिळणार आहे.

**कन्या** : भागीदारी व सहकारी यांच्यातील गोंधळ आणि गैरसमज संपणार आहे.

**तुळ** : वाद-विवाद नकोत.

**वृश्चिक** : नवीन उद्योग व्यवसायाची सुरुवात होऊ शकते.

**धनु** : महत्त्वाची कामे होणार आहेत.

**मकर** : आपल्या सामाजिक कार्यामुळे आपली प्रतिमा उंचावणार आहे.

**कुंभ** : सहकार्याची अपेक्षा ठेवू नका.

**मीन** : मालमत्तेच्या व्यवहारातून चांगला फायदा मिळेल.

---

## जनसंवाद

### कोकणरत्न नारायण राणे यांच्या विजयामुळे कोकण विकासाला चालना मिळणार...!

अभिनंदन, अभिनंदन समस्त रत्नागिरी, सिंधुदुर्ग कोकणवासीयांचे अभिनंदन! बऱ्याच वर्षांनंतर कोकणी जनतेला रत्न निवडण्याची जाण आली, ही आनंदाची गोष्ट आहे. बॅरिस्टर नाथ पै यांच्यानंतर हे पहिले रत्न कोकणी जनतेकरिता होते. त्यानंतर बरीच वर्षे आयाराम-गयाराम खासदारांची निवड झाली. त्यामुळे कोकणी जनतेचे जिव्हाळ्याचे प्रश्न मार्गी लागले नाहीत. प्रश्न मार्गी लागण्यासाठी प्रेम, आस्था लागते. ती कोणत्याही खासदारामध्ये नव्हती. त्यांनी फक्त भत्ते, पगार घेण्याचे काम केले. या पलीकडे काहीही केलेले नाही. आता मा. नारायण राणे यांच्या रुपाने दुसरे रत्न निवडले आहे. त्यांच्या हृदयात कोकणाविषयी प्रेम, आस्था आहे. काम करण्याची धमक आहे. बॅरिस्टर नाथ पै यांच्याबरोबर नारायण राणे यांची तुलना कशी करता? आम्ही तुलना केली ती फक्त विकासकामे करण्याची धमक या दृष्टीने केली आहे. बुद्धिमत्ता ही प्रत्येकाची वेगवेगळी असते. मुख्यमंत्री म्हटले तरी तो पूर्ण महाराष्ट्राचा असतो. त्यामुळे एकाच विभागाचा विकास करता येत नाही. आता मात्र नारायण राणे हे कोकणचा विकास भरपूर करू शकतात. कोकणी जनतेने याचा पुरेपूर फायदा घेऊन त्यांच्याकडून आपल्या विकासाची कामे करवून घ्यावीत. इतर गोष्टींचा विचार करू नये. हा लेख वाचल्यानंतर अनेकांचा पोटसूळ उठेल, त्याला इलाज नाही. जे सत्य आहे, ते कागदावर लिहिण्यात व बोलण्यात गैर आहे, असे मला वाटत नाही. कोणी निंदो अथवा वंदो आपले काम चालू ठेवावे. रत्ने ही वारंवार मिळत नसतात. नारायण राणे यांना त्यांच्या पुढील वाटचालीकरिता खूप खूप शुभेच्छा...!

**- तुकाराम दिनकर खामकर,** जोगेश्वरी

### डोक्यावर मोठे कर्ज असताना आर्थिक केंद्र कसे?

महाराष्ट्राचा येत्या काही वर्षांत जागतिक दर्जाचे आर्थिक केंद्र म्हणून लौकिक निर्माण होईल, असे आश्वासन पंतप्रधानांनी दिले. राज्यातल्या कंपन्या गुजरात नेल्याने कोणते राज्य जागतिक दर्जाचे अर्थिक केंद्र ठरणार आहे? लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला जास्त जागा मिळाल्याने व आगामी विधानसभा निवडणूक जवळ आल्याने विकासकामांना तिप्पट वेगाने मंजुरी दिली जात आहे.राज्याच्या तिजोरीत खडखडात असल्याने, राज्ताचा विकास फक्त कागदावर होत आहे.राज्यावर लोखो कोटीचे कर्ज असल्याने, निधीअभावी विकास कामे सुरूच झालेली नाहीत. मुंबईची दळणवळण व्यवस्था कोलमडली आहे. वाहतूक कोंडी व रस्त्यावरील खड्डे ही मोठी समस्या आहे. फक्त मुंबईचा विकास केल्याने राज्याचा विकास होतो का? विकास करायला निधी लागतो तो केंद्र सरकार देणार आहे का? जीएसटीचा हप्ता केंद्र सरकार वेळेवर देत नाही, ते विकासासाठी काय निधी देणार आहेत? राज्यात एक मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्री असताना देशाच्या पंतप्रधानांना महाराष्ट्र राज्यात का यावे लागते? महायुतीच्या कारभारावर जनतेचा विश्वास राहिलेला नाही का? केंद्र सरकारने राज्याचे कर्ज दूर केल्यानंतरच राज्य जागतिक दर्जाचे आर्थिक केंद्र होऊ शकते.

**- विवेक तवटे,** कळवा

### खेळाडूंसाठी ट्रस्ट असणे आवश्यक

भारताचे माजी कसोटीवीर तसेच दोनदा प्रशिक्षक म्हणून जबाबदारी पार पाडलेले अंशुमन गायकवाड वर्षभरापासून दुर्धर व्याधीशी झुंज देत आहेत. त्यांना मानसिक, आरोग्याविषयी तसेच आर्थिक आधार देण्याचे आवाहन कपिल देव यांनी जगातील सर्वांत श्रीमंत अशा भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला केले आहे. बोर्डाने तत्काळ प्रतिसाद देणे अपेक्षित आहे. कपिल स्वतःची सर्व पेन्शन तसेच गावस्कर, वेंगसरकर, संदीप पाटील, मदनलाल, कीर्ती आझाद, मोहिंदर हे माजी खेळाडू मदत करणार आहेतच. कोटींची बक्षिसे घेणाऱ्या रोहित आणि सहकाऱ्यांनी देखील याकरिता प्रत्यक्ष सहभाग घेऊन चांगला पायंडा पाडावा. या आनुषंगाने कपिल देव यांनी खेळाडूंसाठी ट्रस्ट असण्याच्या गरजेविषयी केलेल्या सूचनेचा गांभीर्याने सकारात्मक विचार व्हावा, जेणेकरून गरजू खेळाडूंना तत्काळ मदत मिळू शकेल!

**- हेमंतकुमार मेस्त्री,** मनोर

### महायुती सरकार की टोमणे सरकार?

कायम उद्धव ठाकरेंना 'टोमणे मारणारे' म्हणून टीका करणारे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री (२) आता कायम सभागृहात टोमणे मारून स्वतःचे हसे करून घेत आहे आणि ज्यांना लोकसभा निवडणुकीत तिकीट नाकारले आणि लोकसभा हरलेल्या उमेदवाराला मागच्या दाराने आणून राज्यसभेत खासदार आणि विधान परिषदेचा आमदार बनविण्यात त्रिमूर्तींनी काय मोठी कामगिरी केली? बाकीच्यांचे ठिक आहे; पण लोकाभिमुख म्हणून कामगिरी करणाऱ्या पंकजाताईंना हा विजय नक्कीच मनास बोचत असेल. महाआघाडीवर टोमणे मारताना आपलेच हसे होत आहे, हे लक्षात येत असेल; पण जनतेसमोर स्वतः नॅरेटिव्ह वागावे आणि खापर विरोधी पक्षावर फोडावे, ही सत्ताधाऱ्यांची तऱ्हाच झालेली आहे आणि याचे परिणाम येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत दिसतील आणि यशापयश आले तर टीकेसाठी महाआघाडी आहे आणि सध्या राज्यात नेत्यांचा तोल आणि ताल यांचा ताळमेळ जमत नसल्यामुळे कामापेक्षा तमाशाने जनता हैराण झालेली आहे.

**- अरुण का. बधान,** डोंबिवली

### मविआचा मुखभंग आणि युतीची सरशी

विधान परिषद निवडणुकीत पुरेसे संख्याबळाचे समीकरण अवघड असताना, महायुतीने आपले सर्व नऊ उमेदवार निवडून आणून महाविकास आघाडीला धक्का दिला. मविआचे जयंत पाटील पराभूत झाले. कोणी तरी एक पराभूत होणार, हे निश्चितच होते. जनतेचा आम्हाला पाठिंबा आहे, असे महायुतीचे नेते म्हणतात; पण या निवडणुकीत जनतेचा पाठिंबा नसतो. कारण विधान परिषदेची निवडणूक आणि विधानसभेची निवडणूक यामध्ये मूलभूत फरक आहे. कारण विधान परिषदेच्या निवडणुकीत घोडेबाजार होतो. तो घोडेबाजार यावेळीही झाला. यात काही नवीन नाही. खरे तर पुरेसे संख्या बळ नसताना, मविआने ही निवडणूक टाळायला पाहिजे होती. जर मविआने तिसरा उमेदवार दिला नसता, तर निवडणूक बिनविरोध झाली असती. लोकसभेच्या पराभवाने दुखावलेल्या महायुतीला विजय साजरा करण्याची संधी मिळाली नसती. मात्र मविआने हे टाळले नाही. मविआने तीन उमेदवार उभे केले. कारण मविआच्या नेत्यांना काँग्रेसची अधिक मते इतर लहान पक्षांची मते आघाडीकडे वळतील, असा जो विश्वास होता, परंतु त्या विश्वासाला पुन्हा एकदा धक्का बसला आहे. कारण विधान परिषदेच्या निवडणुकीत काँग्रेसची मते फुटण्याची परंपरा या वेळीही कायम राहिली. याचा अर्थ काँग्रेस पक्षावर वरिष्ठांचा धाक नाही. याचा प्रामुख्याने काँग्रेसच्या दिल्लीतील नेत्यांनी विचार केला पाहिजे की, प्रत्येक वेळी मत फुटतात कशी? तसेच मविआने लोकसभा निवडणुकीत यश मिळाले म्हणून गाफील राहता कामा नये. कारण विधानसभेची निवडणूक ही कोणत्याही पक्षासाठी सोपी नाही. मात्र या विधान परिषद निवडणुकीत मविआचा मुखभांग झाला महायुतीची रणनीती यशस्वी झाली.

**- सुनील कुवरे,** शिवडी

### शासकीय कार्यक्रमात मराठी भाषेची अवहेलना

गेल्या चार दिवसांत महाराष्ट्राच्या राजधानी मुंबईत दोन शासकीय कार्यक्रम मोठ्या दिमाखात पार पडले. पहिल्या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य विधान परिषदेच्या शताब्दी निमित्ताने उपराष्ट्रपती जगदीश धनखड यांनी विधानभवनात राज्य विधान मंडळाच्या सदस्यांना मार्गदर्शनपर भाषण केले. दुसऱ्या एका शासकीय कार्यक्रमात प्रधानमंत्री (पंतप्रधान!) नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मुंबईतल्या अनेक पायाभूत प्रकल्पांचे भूमिपूजन आणि विकासकामांचे उद्घाटन करण्यात आले. मात्र या दोन्ही शासकीय कार्यक्रमाचे निवेदन आणि सूत्रसंचालन महाराष्ट्राची राज्यभाषा (राजभाषा) असलेल्या मराठी भाषेऐवजी हिंदीमध्ये करण्यात आले. मुंबईतल्या विविध पायाभूत प्रकल्पांच्या माहितीचे लघुपटही हिंदी भाषेत दाखविण्यात आले. त्यामुळे महाराष्ट्राची राज्यभाषा नक्की कोणती? हिंदी की मराठी? असा प्रश्न पडला. एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, ती म्हणजे येथे हिंदी भाषेला विरोध नाही. आक्षेप आहे तो राज्याच्या शासकीय कार्यक्रमात मराठीला डावलून केल्या जाणाऱ्या वाढत्या हिंदी भाषेच्या वापरावर. दुसरीकडे मराठी भाषेचे शब्दभांडार समृद्ध असूनही, शासकीय जाहिरातीतून मराठी शब्दांना डावलून सातत्याने हिंदी शब्दांचा वापर केला जातो. या पार्श्वभूमीवर भविष्यकाळात शासकीय जाहिराती तसेच कार्यक्रमातून मराठी या आपल्या राज्याच्या राज्यभाषेचा सन्मान राखला जाईल, अशी मराठीजनांची अपेक्षा आहे.

**-प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

**सुविचार** : संकटं तुमच्यातली शक्ती, जिद्द पाहण्यासाठीच येत असतात.

## शेवट तर गोड झाला....?

महाराष्ट्राच्या वर्तमान विधानसभेचे शेवटच्या अधिवेशनाचे सूप वाजले. आता पुढचे अधिवेशन नव्या विधानसभेचे असेल, त्यात सत्ताधारी बाकावर कोण असतील, विरोधी पक्षात बसण्याची पाळी कुणावर येईल, हे आतापासून सांगता येणे कठीण आहे. लोकसभा निवडणुकीचा कल तसाच कायम राहिला तर सत्ताधारी महायुतीला विधानसभा निवडणुकीतही धक्का बसू शकतो, परंतु लोकसभा निवडणुकीत झालेल्या चुका टाळण्यासाठी, 'डॅमेज कंट्रोल' करण्यासाठी महायुतीला पुरेसा वेळ मिळत आहे, ही त्यातल्या त्यात महायुतीसाठी समाधानाची बाब म्हणावी लागेल. लोकसभा निवडणुकीच्या वेळी महायुती अतिआत्मविश्वासात वावरत होती, वारे फिरत आहे, वातावरण बदलत आहे याची पुसटशी जाणीवही महायुतीच्या नेत्यांना झाली नाही, त्याचा मोठा फटका महायुतीला बसला, परंतु आता महायुतीचे नेते भानावर आल्याचे दिसते. अर्थसंकल्पाच्या माध्यमातून लोकांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न महायुतीने सरकारने केल्याचे दिसत आहे. सत्ताधारी आमदारांना मोठ्या प्रमाणात विकासनिधी उपलब्ध करून देण्यात आला आहे, त्या माध्यमातून येत्या दोन-चार महिन्यात जनतेच्या नजरेस पडेल अशी कामे या आमदारांकडून केली जातील. त्यातच विधान परिषदेच्या निकालांनी महायुतीला आवश्यक असलेला आत्मविश्वासाचा डोस मिळाला आहे. विधानसभा अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी पार पडलेल्या विधान परिषद निवडणुकीत महायुतीने आपले सगळेच उमेदवार निवडून आणीत महाविकास आघाडीला नक्कीच धक्का दिला आहे. ही निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी दोन्ही गटांकडून फारशा गांभीर्याने प्रयत्न झालेच नाहीत, कारण दोन्ही गटांना आपले सगळे उमेदवार विजयी होतील याची खात्री होती. महाविकास आघाडीला ही खात्री अधिकच होती. संख्याबळाचे गणित त्यांच्या बाजूने होते. काँग्रेसकडील अतिरिक्त मतांच्या जोरावर आपले उर्वरित दोन्ही उमेदवार सहज निवडून येतील, असे महाविकास आघाडीला वाटत होते आणि त्यांचा हा तर्क योग्यच होता, परंतु काही आमदार शरीराने एका पक्षात असले तरी मनाने दुसऱ्याच पक्षात होते, त्याची कुणकुण शेवटच्या क्षणी लागली, परंतु तोपर्यंत उशीर झाला होता. त्यातच मतदान गुप्त पद्धतीने होणार असल्याने अडचण वाढली होती. झिशान सिद्दीकी सारखे आमदार पक्षादेश पाळणार नाही, हे उघडच दिसत होते, परंतु बंडखोरांची ही संख्या किती मोठी असू शकते, याचा अंदाज आघाडीच्या नेत्यांना आला नाही. काँग्रेसने आपला एकच उमेदवार रिंगणात उतरविला होता, त्यामुळे काँग्रेसच्या उमेदवाराला दगाफटका होण्याची शक्यताच नव्हती, परंतु काँग्रेसकडे असलेल्या अतिरिक्त मतांच्या जोरावर रिंगणात असलेल्या मिलिंद नार्वेकर आणि जयंत पाटील यांच्यावर टांगती तलवार होती. मिलींद नार्वेकरांचे सगळ्याच पक्षातील नेत्यांसोबत सलोख्याचे संबंध होते किंवा आहेत. निवडणुकीपूर्वी त्यांनी अनेकांच्या भेटीगाठी घेतल्या आणि आपली बाजू भक्कम करण्याचा प्रयत्न केला. जयंत पाटील मात्र आपल्याला शरद पवारांचा पाठिंबा आहे, म्हणजे आपला विजय निश्चित आहे, याच भ्रमात वावरत होते. नाना पटोलेंच्या वक्तव्यात तथ्य असेल तर जयंत पाटलांनी काँग्रेसकडे असलेल्या अतिरिक्त मतांसाठी त्यांच्यासोबत संपर्कही साधला नाही. हा अतिआत्मविश्वासच शेवटी दगा देऊन गेला. खरे तर काँग्रेसचे काही आमदार फुटणार ही चर्चा आधीपासूनच होती, त्यामुळे जयंत पाटलांनी सावध होणे गरजेचे होते. कदाचित अजित पवार गटातील काही आमदार आपल्याला साथ देतील, असे त्यांना वाटले असावे, परंतु तसे झाले नाही. अजित पवार गटाचे आमदार आपल्या पक्षासोबतच राहिले, काँग्रेसच्या काही फुटीर आमदारांनी अजित पवारांना साथ दिली, एक-दोन आमदार भाजपकडेही वळले, त्यामुळे जयंत पाटलांचे गणित बिघडले. त्यांच्याकडे शरद पवार गटाचे बारा आणि शेकापचा एक असे हक्काचे तेरा आमदार होते, काँग्रेसकडील पाच-सहा आमदारांनी त्यांना साथ दिली असती तर दुसऱ्या पसंतीच्या जोरावर त्यांना बाजी मारता आली असती, त्यांचे स्वतःचे आकलनही तेच होते, परंतु त्यांना बाहेरून मदत तर झाली नाहीच, उलट त्यांच्या हक्काच्या आमदारांमधूनही एकाने त्यांना साथ दिली नाही, त्यामुळे त्यांची गाडी बारावरच अडकली. लोकसभेतील घवघवीत यशानंतर विधानसभेसाठीही मविआला अनुकूल वातावरण असताना मविआच्या काही आमदारांनी या निवडणुकीत वेगळा विचार करावा, ही बाब मविआसाठी नक्कीच धक्कादायक म्हणावी लागेल. त्या दृष्टीने विचार करता महायुतीसाठी विधानसभेचा शेवट गोड झाला असेच म्हणावे लागेल, अर्थात हा गोडवा पुढच्या विधानसभा निवडणुकीपर्यंत टिकतो की नाही, यावर मात्र प्रश्नचिन्ह कायम आहे.

## हल्ला ट्रम्पवर, जखम....!

शनिवारी पेनसिल्व्हेनिया राज्यातील बटलर येथील सभेदरम्यान रिपब्लिकन पक्षाकडून अध्यक्षीय निवडणुकीचे प्रबळ दावेदार असलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर हल्ला झाला. या हल्ल्यातून ट्रम्प थोडक्यात बचावले. हल्लेखोराने झाडलेली गोळी त्यांच्या कानाला चाटून गेली. या हल्ल्यातून बचावलेल्या ट्रम्प यांच्यासाठी हा हल्ला राजकीय फायद्याचा ठरण्याची शक्यता आहे. या हल्ल्याचा जगभरातील अनेक नेत्यांसह अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांनीही तीव्र शब्दात निषेध केला असला तरी ट्रम्प समर्थक या हल्ल्यासाठी अप्रत्यक्षरित्या बायडेन यांना जबाबदार धरत आहे. काही दिवसांपूर्वी बायडेन यांनी एका सभेत ट्रम्प यांना 'बुल्स आय'मध्ये ठेवण्याची भाषा केली होती. बायडेन ट्रम्प यांना लक्ष्य करावे असे म्हणत होते, त्याचा संदर्भ निवडणुकीतील पराभवाशी होता, परंतु ट्रम्प समर्थकांनी या हल्ल्यानंतर बायडेन यांच्या वक्तव्याचा वेगळा अर्थ काढीत बायडेन यांच्या विरोधात आघाडी उघडली आहे. परंतु ट्रम्प यांच्यावर हल्ला करणारा हल्लेखोर रिपब्लिकन पक्षाचाच नोंदणीकृत सदस्य असल्याचे समोर येत आहे. त्यामुळे ट्रम्प यांचे हे 'व्हिक्टीम कार्ड' कितपत प्रभावी ठरेल, याबद्दल साशंकता व्यक्त केली जात आहे. दरम्यान सोमवारी अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी आपला उमेदवार निश्चित करण्यासाठी रिपब्लिकन पक्षाचे अधिवेशन होणार आहे. या अधिवेशनात ट्रम्प यांच्या उमेदवारीवर अधिकृत शिक्कामोर्तब होणे अपेक्षित आहे. ट्रम्प यांच्यावरील हल्ल्यानंतरही अधिवेशनाच्या कार्यक्रमात बदल करण्यात आला नसल्याचे आयोजकांकडून स्पष्ट करण्यात आले आहे. या अधिवेशनात स्वतः ट्रम्पदेखील उपस्थित राहण्याची शक्यता आहे. त्यांना झालेली जखम फारशी गंभीर नाही, उलट हल्ल्यानंतर आपली उजवी मूठ उंचावत ट्रम्प यांनी जो निर्धार व्यक्त केला तो पाहता ते या अधिवेशनाला आवर्जुन उपस्थित राहतील, अशीच शक्यता आहे. अर्थात पक्षातील ट्रम्प यांचा प्रभाव पाहता हा हल्ला झाला नसता तरी उमेदवारीची माळ त्यांच्याच गळ्यात पडणार होती, परंतु या हल्ल्यानंतर त्यांची पक्षातीलच नव्हे तर अध्यक्षीय निवडणुकीतही बाजू मजबूत झाल्याचे दिसते. डेमोक्रेटिक पक्षात बायडेन यांच्याच उमेदवारीवरून संभ्रमाची स्थिती आहे. त्यांचे वय आणि प्रकृतीबाबत अनेक स्वपक्षियांनाच शंका असताना ताज्या सर्वेक्षणांमध्ये ट्रम्प यांनी आघाडी घेतल्याचे चित्र आहे. त्यातच या हल्ल्यामुळे ट्रम्प यांच्याकडे मोठ्या प्रमाणात सहानुभूती वळू शकते. या गोळीबाराच्या घटनेने मतदारांमध्ये ध्रुवीकरण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. थोडक्यात काय तर हल्ला ट्रम्पवर झाला असला तरी जखम मात्र बायडेन यांच्या पक्षाला झाली आहे.

---

### शिवार

## कपाशी आणि सोयाबीन उत्पादक शेतकरी आणि खरीप हंगामातील उपाययोजना




**अनिल भोकरे**
9422367262
सेवानिवृत्त प्रकल्प संचालक, आत्मा तथा संचालक- ॲग्रेरियन


पिकाच्या योग्य व्यवस्थापनासाठी पाणी, खत, कीटकनाशके यांचा संतुलित वापर करणे आवश्यक आहे. कपाशी पिकाच्या रोगप्रतिबंधक व्यवस्थापनासाठी शास्त्रीय पद्धतींचा अवलंब करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील पिकांच्या वाढीसाठी वेळोवेळी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे आणि एकमेकांशी अनुभवांची देवाणघेवाण करून पिकाच्या समस्यांचे निराकरण करावे.



खरीप हंगामाच्या दृष्टीने महाराष्ट्रातील अनेक भागांत चांगला पाऊस पडत असून शेतकरी बांधवांना पिकांच्या वाढीसाठी उत्तम वातावरण मिळाले आहे. परंतु, काही भागांत संततधार पावसामुळे कपाशी व सोयाबीन पिकावर विपरीत परिणाम दिसून येत आहेत. ज्यांनी पूर्व हंगामी कपाशीची लागवड केलेली आहे, अशा शेतकऱ्यांना रोपांची पाने पिवळी पडत असल्याच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे किंवा पुढील काही दिवसांत ही समस्या वाढू शकते. सतत पडणाऱ्या पावसामुळे शेतात पाणी साचून राहिल्याने पाने पिवळी पडणे, रोपांची वाढ खुंटणे, इत्यादी समस्या निर्माण होतात. त्यामुळे शेतात साचलेले पाणी त्वरित काढण्यासाठी योग्य पद्धती वापरणे गरजेचे आहे, कारण पाण्याचा निचरा न झाल्यास मुळांना ऑक्सिजनची कमतरता भासू शकते, ज्यामुळे रोपांची वाढ खुंटते. मातीमध्ये नत्राची कमतरता असल्याचेदेखील हे संकेत असतात, त्यामुळे प्रत्येकी एक एकरमध्ये २२-२३ किलोग्रॅम युरिया या नत्रयुक्त खताची मात्रा दिली पाहिजे. लिक्विड स्वरूपातील युरिया वापरत असल्यास साधारणतः २२५ मिली मात्रा द्यावी. युरियाचा योग्य प्रमाणात वापर केल्याने पिकांची वाढ सुधारू शकते आणि पानांचा रंग परत हिरवा होऊ शकतो. मातीचे परीक्षण करून त्यामध्ये कोणत्या अन्नद्रव्यांची कमतरता आहे हे जाणून घेणे अत्यंत गरजेचे आहे, त्यामुळे योग्य प्रमाणात आवश्यक खतांचा वापर करता येतो. रासायनिक खतांबरोबरच सेंद्रिय खतांचा वापर करणेही फायदेशीर ठरते. गोमूत्र, कंपोस्ट खत, गळिताचा पाला, इत्यादी सेंद्रिय खतांचा वापर मातीच्या आरोग्यासाठी उपयुक्त असतो. पिकाच्या योग्य व्यवस्थापनासाठी पाणी, खत, कीटकनाशके यांचा संतुलित वापर करणे आवश्यक आहे. कपाशी पिकाच्या रोगप्रतिबंधक व्यवस्थापनासाठी शास्त्रीय पद्धतींचा अवलंब करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील पिकांच्या वाढीसाठी वेळोवेळी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे आणि एकमेकांशी अनुभवांची देवाणघेवाण करून पिकाच्या समस्यांचे निराकरण करावे.

सध्याच्या हवामानामुळे सोयाबीनवर मोठ्या प्रमाणात पाने खाणाऱ्या अळ्यांचा, तसेच खोड किडीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. तंबाखूवरील पाने खाणारी अळी 'स्पोडोप्टेरा' या लष्करी अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी वेळीच किडीचा प्रादुर्भाव ओळखून उपाययोजना कराव्यात. पिकाच्या सुरुवातीचे अवस्थेत पीक तणमुक्त ठेवावे व बांधावर असणाऱ्या किडीच्या पुरक खाद्य वनस्पतींचा नाश करावा. किडग्रस्त झाडे, पाने, फांद्या यांचा आतील किडीसह नायनाट करावा. पाने खाणारी अळीची अंडी व सुरुवातीच्या अवस्थेतील अळीग्रस्त पाने अलगद तोडून किडीसह नष्ट करावीत.

हिरवी घाटेअळी व पाने खाणारी अळी या किडीची प्रादुर्भावाची पातळी समजण्यासाठी प्रति एकरी २ कामगंध सापळे शेतात लावावेत. शेतात इंग्रजी 'T' अक्षरासारखे प्रति एकरी २० पक्षी थांबे लावावेत. तंबाखूवरील पाने खाणाऱ्या अळीच्या व्यवस्थापनासाठी एस.एल.एन.पी.व्ही.५०० एल.ई. विषाणू ४०० मि.ली. किंवा नोमुरिया रिलाई जैविक बुरशीची ८०० ग्रॅम प्रति एकरी फवारणी करावी. पाने खाणाऱ्या अळ्यांच्या व्यवस्थापनाकरिता ५ टक्के निंबोळी अर्क किंवा अझाडिरेक्टिन १५०० पीपीएम ५०० मिली प्रती एकरी फवारणी करावी.

पिकांचे नियमित सर्वेक्षण करून किडींनी आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यास प्रोफेनोफॉस ५० टक्के ४०० मिली किंवा इथिऑन ५० टक्के ६०० मिली किंवा थायमिथाक्झाम १२.६ टक्के + लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ९.५ टक्के (पूर्व मिश्रित किटकनाशक) ५० मिली किंवा क्लोराट्रानिलीप्रोल १८.५ टक्के ६० मिली प्रती एकर फवारावे. शंखी गोगलगायीचा प्रादुर्भाव वाढल्यास गोगलगायी गोळा करून मिठाच्या पाण्यात टाकून नष्ट कराव्यात. आवश्यकता वाटल्यास तज्ज्ञांच्या सल्ल्याने गोगलगायींच्या नियंत्रणासाठी मेटाल्डीहाईड गोगलगायनाशक २ किलो प्रति एकर शेतामध्ये पसरवावे.

कीटकनाशके फवारणी करताना योग्य ती संरक्षक विषयी काळजी घ्यावी. कीटकनाशके, बुरशीनाशके, विद्राव्य खते, सूक्ष्म मूलद्रव्ये अथवा रसायने मिसळून फवारणी केल्यास पिकाला अपाय होऊ शकतो, तसेच कीडनाशकांचा अपेक्षित परिणामही दिसून येत नाही. त्यामुळे ती आवश्यकतेनुसार वेगळी वेगळी फवारणी करावी. वरील सर्व उपाययोजनांचा योग्य अवलंब केल्यास पिकांचे उत्पादन वाढू शकते आणि पानांचा रंग सुधारू शकतो. शेवटी, योग्य काळजी घेतल्यासच उत्तम उत्पादन मिळू शकते.

---

### थर्ड अम्पायर

## ...यासाठीच 'आयएएस' व्हायचं असतं का?




**जयंत महाजन**
9420691420


दहा- बारा तास एमपीएससी, युपीएससीचा अभ्यास करणाऱ्या प्रामाणिक विद्यार्थ्यांनी आता स्पर्धा परीक्षेचा नाद सोडून दिलेला चांगला. या परीक्षांमध्ये प्रामाणिकता असते असे आजपर्यंत वाटत होते; पण सगळीकडे दलालांचा सुळसुळाट झाला आहे...

एकेकाळचा भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार व सध्याचा प्रशिक्षक राहुल द्रविडने त्याला मिळालेल्या पाच कोटी रुपयांतून फक्त अडीच कोटी स्वीकारले व उर्वरित अडीच कोटी रुपये सपोर्टिंग स्टाफला देण्यात यावे, असे सुचविले. खरं म्हणजे स्वार्थी जगात अशा बातम्यांना मीडियाने खूप जागा दिली पाहिजे; पण या देशात पूजा खेडकर यांच्यासारखी प्रकरणे बाहेर पडतात व त्याच बातमीला प्राधान्य द्यावे लागते. ग्रामीण भागातून प्रचंड मेहनत करून गरिबीशी झुंज देऊन पुणे, दिल्ली येथे जाऊन 'आयएएस' होण्यासाठी जीवाचे रान करणाऱ्या पिढीला पूजा खेडकर प्रकरण नैराश्याच्या गर्तेत ढकलू शकते. स्वतःला अंधत्व असल्याचे व मानसिक रुग्ण असल्याचे खोटे सर्टिफिकेट पूजा खेडकर नावाची उद्दाम महिला मिळविते, यात आश्चर्य काहीच नाही; परंतु हे सर्टिफिकेट देणाऱ्यांना कोठडी दाखविता येईल का? हा खरा सवाल आहे. पण आता असे वाटते, की पूजा खेडकर यांच्यावर कारवाई न करता त्यांच्या 'अगाध' ज्ञानाचा फायदा घेतला पाहिजे. कमी मार्क असूनसुद्धा युपीएससी परीक्षेत पास कसे व्हायचे? ओबीसी कोट्यातून परीक्षा देताना बोगस क्रिमीलेअर सर्टिफिकेट कसे मिळवायचे? अंशतः अंधत्व व मानसिक रुग्ण असल्याचा दाखला कसा मिळवायचा? वडिलांचे उत्पन्न ४० कोटी इतके असतानाही नियमात कसे बसायचे? वैद्यकीय चाचण्यांना गैरहजर राहूनही कोणत्या मार्गाने चाचणीत उत्तीर्ण व्हायचे? दिल्लीच्या 'एम्स'मध्येसुद्धा वैद्यकीय चाचणीला दांडी कशी मारायची? खासगी एमआयआर सेंटरमधून रिपोर्ट मॅनेज कसा करायचा? आपल्याच नगर जिल्ह्यातील रुग्णालयातून पाहिजे तसे प्रमाणपत्र कसे मिळवायचे? आदी अनेक बाबींचे ट्रेनिंग पूजाबाईंनी नव्या पिढीला दिलेच पाहिजे!

'नीट'च्या परीक्षेनंतर यूपीएससीचे असे घोटाळे समोर येत आहेत. 'कॅट'ने खेडकरांच्या विरोधात निकाल देत अंधत्व 'खोटे' असल्याचे सांगितले होते; पण या देशात काहीही होऊ शकते या नियमानुसार त्यांच्या नियुक्तीबाबत सकारात्मक निर्णय झाला व पूजा खेडकर नावाचा एक 'अभ्यासग्रंथ' या देशातील तरुणांना अभ्यासायला मिळाला. भंडारा येथे नियुक्ती दिल्यानंतरही तातडीने त्यांना पुणे येथे पोस्टींग देण्यात आली. यावरूनच खेडकरांची पोच किती दूरवर आहे, याचा अंदाज जनतेला यावयास हवा. कदाचित चौकशी करणाऱ्यांची चौकशी सुरू होईल. एवढेच नव्हे, तर चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याच्या कानशीलाजवळ पिस्तूलही टेकविले जाईल. जिथे जिल्हाधिकाऱ्यांचे काही चालत नाही, तेथे चौकशी अधिकारी काय कपाळ चौकशी करणार? त्यांच्या खासगी गाडीवर त्यांनी लाल दिवा लावला म्हणून ओरड सुरू झाली आहे; परंतु तो त्यांचा जन्मसिद्ध हक्कच आहे. त्यांनी स्वतःच्या ऑडी गाडीवर सरकारी लाल दिवा, भारत सरकारचे स्टिकर लावले, तर एवढी बोंबाबोंब का? सरकारी वाहन, निवासस्थान, दालन आणि शिपायाची किरकोळ मागणी त्यांनी करू नये का? एवढ्या उच्च पदावर वेगवेगळ्या 'मार्गा'ने पोचल्यावर त्यांनी रुबाब करू नये का? वास्तविक जिल्हाधिकाऱ्यांसोबत काम करत त्यांचे कामकाज शिकणे हे गरिबीतून शिक्षण घेऊन व मेरिटमध्ये येणाऱ्या प्रशिक्षणार्थीचे काम असते. वेगवेगळ्या मार्गाने यश मिळवून तेथे पोहोचलेल्या बाईंना त्याची काय गरज? वडिलोपार्जित करोडपती असलेल्या पूजा बाईंना स्वतंत्र दालन न देणे हा त्यांच्यावर अन्याय नाही का? त्यांच्यासाठी निदान अटॅच बाथरुम देण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः स्वीकारण्याची गरज होती. पूजा खेडेकरांनी परवानगीशिवाय अप्पर जिल्हाधिकाऱ्यांच्या अँटी चेंबरमधील सोफा, टेबल, खुर्च्या सगळे साहित्य कर्मचाऱ्यांकडून काढून घेतले, याबाबत एवढा गहजब करण्याची गरज नव्हती. कारण जन्मताच सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्म झालेल्यांना या सुविधा सरकारने पुरविल्याच पाहिजे. आता जिल्हाधिकाऱ्यांनाच धडा शिकविण्यासाठी खेडकर यांची विशेष यंत्रणा कार्यरत झाली तर नवल वाटू नये. एवढी प्रचंड मेहनत घेऊन 'आयएएस' झालेल्या बाईंची 'पुणे तेथे काय उणे' अशा शहरातून वाशिमला बदली करणे, हा पूजा खेडकर यांच्यावर प्रचंड अन्याय करणारा क्षण आहे. बडतर्फी करण्याची हिंमत कुणी करणार नाही. म्हणूनच फक्त बदली करण्यात आली. सरकारी नोकर असलेल्या आपल्या बापाचे उत्पन्न वर्षाला एखाद्या कोटीचे, एकूण संपत्ती शंभर कोटींची, कुटुंबीयांकडे शंभर एकरहून अधिक जमीन, सात- आठ फ्लॅट्स, एक लाख स्केअर फुटाची सहा दुकाने, अशी श्रीमंती असलेल्या या कुटुंबाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणाऱ्यांना इतिहास कधीच क्षमा करणार नाही. दहा- बारा तास एमपीएससी, युपीएससीचा अभ्यास करणाऱ्या प्रामाणिक विद्यार्थ्यांनी आता स्पर्धा परीक्षेचा नाद सोडून दिलेला चांगला. या परीक्षांमध्ये प्रामाणिकता असते असे आजपर्यंत वाटत होते; पण सगळीकडे दलालांचा सुळसुळाट झाला आहे.



आता एक उदाहरण बघा- ठाणे जिल्ह्यातील एका आमदाराने पोलीस ठाण्यात गोळीबार करूनही त्यांची आमदारकी रद्द न होता उजळमाथ्याने ते विधान परिषद निवडणुकीत मतदान करायला तुरुंगातून आले. दुसरीकडे राहुल गांधींनी कर्नाटकात एक भाषण केले व गुन्हा दाखल झाला तो गुजराथमध्ये. सत्र न्यायालयाने तातडीने निकाल दिला व त्यांची खासदारकी रद्द झाली. तातडीने त्यांचा सरकारी बंगलाही काढून घेतला जातो. किरकोळ आरोपावरून महुआ मोईत्रा यांची खासदारकी रद्द केली जाते. त्यामुळे सांगावेसे वाटते की, पूजा खेडकर प्रकरणात होऊन होऊन काय होईल? थोड्या दिवसात 'क्लीनचिट'चा संदेश येईल व पुन्हा एकदा खेडकर बाई पुण्यातील त्यांना पाहिजे त्या खुर्चीत जाऊन बसतील!

---

### मनाचिये गुंती

## आयुष्य चाळीशी नंतरचे...




**वैशाली पाटील**
9420350171


परवाच एका 'ग्रुप'मध्ये एक वाक्य ऐकले- 'माणसाचं खरं जगणं हे चाळीशीनंतरच सुरू होतं.'....थोडसे वेगळे वाटले ऐकायला; पण विचार केला तर यात तथ्य आहे. एका कुठल्या तरी सिनेमात स्त्री विषयी असाही डायलॉग होता, की स्त्री चाळिशीमध्ये बर्फी दिसते..यातील विनोदाचा भाग सोडला, तर खरंच स्त्री किंवा पुरुष ४० मध्ये किंवा चाळीशीनंतर बऱ्यापैकी त्यांच्या आयुष्यात स्थिरावलेले असतात, त्यामुळे एक आत्मिक समाधान त्यांच्या वागण्या-बोलण्यात आणि एकूणच चेहऱ्यावर असते.. बालपण निरागस असले, सुखी असले, तरी जगणे म्हणजे काय, हे तेव्हा कळलेले नसते. त्या पुढील काळात अभ्यास, स्पर्धा, चढाओढ असते. त्यामुळे तारुण्य केव्हा समोर येऊन उभे राहते तेही लक्षात येत नाही आणि मग त्या टप्प्यावर करिअर, लग्न, मुले यांच्यामागे आयुष्य धावधाव धावत राहते. आणि मग चोर पावलांनी चाळीशी येऊन टपकते. मुले आपल्या मार्गाने वाटचाल करीत असतात, पुरुष आपल्या कामात मुरलेले असतात.. स्त्रियांनाही इतर कौटुंबिक जबाबदाऱ्यांमधून विसावा मिळालेला असतो. अर्थात या वयात जबाबदारीतून मुक्त होण्याचे दिवस येतात आणि मग माणसांना जगण्याचे वेध लागतात. जीवन, जगणे याचे खरे अर्थ उलगडू लागतात. राग, लोभ, अपेक्षा यांचे फायदे, तोटे समजू लागतात. याच वयात भावनांवर थोडा ताबा येऊ लागतो. समाधान, शांती याचे गमक समजू लागते. स्वतःसाठीदेखील जगायचे असते याची जाणीव होऊन माणूस आयुष्यातील काही क्षण स्वतःसाठी राखीव ठेवू लागतो. दिवाळीचे पदार्थ संपत आल्यावरच ते जास्त खावेसे वाटतात..अगदी तसंच आयुष्याचे असते....ते संपत येत असते...आणि तेव्हाच ते खूप जगावसे वाटते, कारण आयुष्याच्या याच टप्प्यावर या क्षणभंगूर आयुष्याचा अर्थ कळायला लागतो. आपले आयुष्य हे आपल्यासाठीही जगायचे असते....इतरांकडून अपेक्षा करत राहण्यापेक्षा स्वतःकडून अपेक्षा करून आनंदी राहायचे असते....रुसवे, फुगवे सोडून छान प्रेमाने राहायचे असते. रागावर नियंत्रण ठेवून स्वतःचे मानसिक आरोग्य जपायचे असते...आणि जगताना या जगात आपण आणि आपले आरोग्य हेच खूप महत्त्वाचे असते. हे सारे याच वयात समजायला लागते. आणि म्हणूनच माणसाला उरलेले आयुष्य स्वतःसाठी, स्वतःच्या इच्छापूर्तीसाठी जगायचे असते. मनात खोलवर अनेक स्वप्नं गाढलेली असतात. ती पुन्हा जगायची असतात. लोकं काय म्हणतील? हा प्रश्न आता तसा बोथट झालेला असतो. आता फक्त पैलतीर दिसत राहते. म्हणूनच मरण्याआधी राहून गेलेले क्षण पुन्हा खुणावत राहतात. आणि म्हणूनच चाळीशीचे रंग सुंदर आणि स्वच्छंदी वाटतात...तेच पुन्हा नव्याने खुलू पाहतात. त्यांचे त्यांचे एक आकाश त्यांना गवसते. त्यात ते पुन्हा नव्याने विहरत राहतात. त्यांचे त्यांचे थवे तयार होतात. आणि पुन्हा ही गद्य चाळीशी नवा रंग उधळत राहते...त्यांच्या क्षितिजावर....

हो...हे असं व्हायलाच हवे. तरच जगणे सार्थकी लागते. या वयात थोडे व्हावे मोकळे....जबाबदाऱ्यांमधून...थोडा मुक्त श्वास घ्यावा....आणि जगावे बेधुंद होऊन....शेवटी मृत्यू अटळच आहे ना! मग तो येण्याआधी घ्यावे की जगून! मला इथे गुलजार यांची एक शायरी आठवते...,

**'जो लम्हा साथ है, उसे जी भरके जी लो...
कम्बख्त ये जिंदगी, भरोसे के काबील नहीं....'**

अगदी खरे आहे. जगताना आपण कशाच्या मागे धावतोय, किंवा धावायला हवे हेच माणसाला लवकर कळत नाही. आणि कळले तरीही अनेक जबाबदाऱ्या त्याला विळख्यात बांधून ठेवतात. आणि म्हणूनच अनेक सुंदर क्षण हातातून निसटून जातात. म्हणूनच रंग चाळीशीचे समजून घ्या. शांत, निरपेक्ष राहून या सुंदर सृष्टीचा, क्षणांचा आनंद घ्या. असे म्हणतात की, वयाला हरवायचे असेल, तर आपले छंद जिवंत ठेवा. मित्रमैत्रिणींना जपा, त्यांच्यासोबत वेळ घालवा. याच वयात अनेक आजार झडप घालायला येऊ पाहतात; पण जर का आपण चाळीशीचे रंग ओळखून उत्साही जगणे निवडले...तर हे आजारही घाबरून पळून जातात. या वयात रागावर नियंत्रण यायलाच हवे. स्वतःला जे जे वाटते ते ते मस्तपणे करता यायला हवे.

अर्थात हे सारे सकारात्मक, आनंद देणारे आणि इतरांना हानी न पोहोचवणारे असावे. जाता जाता इतकेच...

---

### वाचक विचार मंच

## लहरी अतिवृष्टीवर उपाययोजनांची गरज!

उष्ण कटिबंधातील होणारे हवामान बदल, जागतिक तापमान यांमुळे निर्माण होणाऱ्या सागरी उष्णतेच्या लाटा सर्व बदलांना कारणीभूत ठरत असतात. पावसाच्या बदलत्या पर्जन्यवृष्टीचे आणि तापमान वाढीचे संकटही याच कारणांमुळे भारताला त्रासदायक ठरत आहे. सागरांच्या पाण्याच्या हवामान बदलाचे आणि तापमान वाढीचे दुष्परिणाम देशाच्या ऋतूचक्रावर होत आहेत. या बदलांमुळे दक्षिणेतील चेन्नई, बंगळुरू ह्या शहरांना गेल्या काही वर्षांत मुसळधार पावसाला सामोरे जाण्याचे अनुभव येत आहेत. ऊर्जा, पर्यावरण आणि जलसंस्थांनी केलेल्या पाहणीच्या निष्कर्षानुसार नैऋत्य मोसमी पावसाने मोठ्या प्रमाणात उसळी घेतली आहे, असे दिसून येते. पश्चिमेकडील मध्य महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान आणि काहीशा तामिळनाडूत कोरडे म्हणून समजले जाणारे प्रदेश यांमध्ये पावसाचे प्रमाण बऱ्यापैकी वाढले आहे. २०१२ ते २०२२ या दशकांत देशातील ५५ टक्के तालुक्यांत पावसाचे प्रमाण दहा टक्क्यांनी वाढले आहे. गेल्या तीन- चार दशकांत पर्जन्यवृष्टीचा विश्लेषणात्मक अभ्यास करणाऱ्या संस्थांनी नैऋत्य मोसमी पावसाच्या वेगाच्या आणि प्रमाणाच्या वाढीची नोंद घेतली आहे. सन २०२३ हे वर्ष जागतिक पातळीवर सर्वाधिक उष्ण वर्ष म्हणून नोंदविले गेले आहे. त्याच प्रकारे सन २०२४ मध्येही असह्य उष्णतेला सामोरे जावे लागत आहे, याची प्रचिती आपल्याला येतच आहे.

नैऋत्य मोसमी पावसाचे देशाच्या काही भागांत जसे प्रमाण वाढले आहे, तसेच देशाच्या उत्तर व ईशान्येकडील बिहार, उत्तराखंड, आसाम, मेघालय या राज्यांमधील ८७ टक्के तालुक्यांतील पीक पेरणी काळात पडणाऱ्या पावसाच्या प्रमाणात घट झाली असल्याची नोंद घेतली गेली आहे. अशा प्रकारे लहरी होत चाललेल्या पर्जन्यवृष्टीचे प्रमाण आणि बदलता काळ, अतिवृष्टी, वाढते तापमान या विषयांचा सखोल अभ्यास करणाऱ्या तज्ज्ञ शास्त्रज्ञांनी यावर उपायात्मक योजना व त्यासाठी करावी लागणारी पूर्वतयारी करण्यासाठी सर्व प्रशासकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्याची गरज आहे. प्रशासकांकडून घेतल्या जाणाऱ्या सावधगिरीच्या उपायांनी शेतकरी बांधव आणि सामान्यजन जागृत होऊन येणाऱ्या नैसर्गिक आपत्तींना सहजतेने सामोरे जाऊ शकतील.

**राजन पांजरी,**
मुंबई, मो. नं.: ९८१९७००८१८

---

### धुमस

पराजय
विधानपरिषदेच्या
निवडणुकीचा
संपला अखेर थरार
आघाडीच्या उमेदवाराचा
टांगापलटी, घोडे फरार

जुने जाणते सांगतात
असाच चमत्कार घडतो
हा नक्की निवडून येणार
नेमका तो भिडूचं पडतो

हाच प्रत्यय आला
महाराष्ट्राला ह्यावेळी
युती म्हणते साहेबांची
फसली राजकीय खेळी

**ॲड. अनंत खेळकर**
अकोला

---

### जगभ्रमंती

## ...हे आहे जगातील सर्वात मोठे धरण

जगात अनेक बंधारे बांधले गेले आहेत, त्यातील काही खूप मोठे आहेत. काही फार लांब आहेत; पण तुम्हाला माहिती आहे का, जगातील सर्वात मोठे धरण कोणते आहे? नाही ना.. जगातील सर्वात मोठे धरण चीन देशात आहे. ज्याचे नाव आहे 'थ्री गॉर्जेस डॅम'.

इंटरनॅशनल वॉटर पॉवर अँड डॅम कन्स्ट्रक्शन वर्तमानपत्रानुसार, २.३ किलोमीटर लांबीचे, ११५ मीटर रुंद आणि १८५ मीटर उंच असे हे जगातील सर्वात मोठे जलविद्युत धरण आहे. जगातील तिसऱ्या क्रमांकाची नदी मानल्या जाणाऱ्या चीनच्या हुबेई प्रांतातील यॉंग्झी नदीवर हे धरण बांधले गेलेले आहे. या नदीची लांबी सहा हजार किलोमीटरपेक्षा अधिक आहे.

असं म्हणतात की, हे विशाल धरण बांधण्यासाठी अडीच लाख कोटींपेक्षा जास्त खर्च आला आहे. ते तयार करण्यास १८ वर्षांचा कालावधी लागला आहे. त्याचे बांधकाम वर्ष १९९४ मध्ये सुरू झाले आणि ते २०१२ मध्ये पूर्ण झाले आहे.

असे म्हणतात की, 'थ्री गॉर्जेस डॅम' तयार करण्यासाठी ४ लाख ६३ हजार टन स्टीलचा वापर करण्यात आला आहे. बरीच आयफेल टॉवर्स या स्टीलमध्ये उभी केली जाऊ शकतात. चीनचे हे धरण अमेरिकेच्या महान हूवर धरणापेक्षा ११ पट अधिक वीज निर्मिती करू शकते. एका अंदाजानुसार, त्यात २२,४०० मेगावॅट ऊर्जा निर्मितीची क्षमता आहे, म्हणजेच वीज निर्मितीमध्ये त्याची तोड नाही.

असे म्हणतात की, या धरणाच्या जलाशयात इतके पाणी साचले आहे, की त्याचा पृथ्वीवरील जडपणावर परिणाम झालाय. यामुळे पृथ्वीच्या फिरण्याच्या गतीने थोडा वेग मंदावला आहे. दिवसाची वेळ ०.०६ मायक्रोसेकँड्सने वाढली आहे, जेव्हा पृथ्वीची फिरतानाची गती कमी होत आहे, म्हणजे दिवस थोडा जास्त झाला आहे. या व्यतिरिक्त असेही म्हणतात की, या धरणाच्या बांधकामामुळे उत्तर आणि दक्षिण ध्रुवदेखील आपापल्या ठिकाणाहून २-२ सेंटीमीटर अंतरावर गेले आहेत, तर पृथ्वी इतर ध्रुवावर किंचित सपाट झाली.

---

### गुल्लेर

## बेदम झाला मानूस!




**नरेंद्र इंगळे**
9561226572


'काम झालं काय?'

'बुरी गोठ आहे.. तू जाऊन पाह्य सेतूत.. एकमेकाच्या आंगावर चढतात. दोन- दोन घंटे तठ उभं राहा लागते.. बसाले जागा नाही.. मले कामी लाऊन देलं अन तू मस्त टिव्ही पाहून राह्यली.'

'सेतू दूर आहे.. मले गाळी चालोता येते काय?'

'तुहा झमेला अलग अन पोरीचा अलग.. तिच्या उत्पन्नाच्या दाखल्यासाठी लय चकरा मारल्या. सात हजार दाखले पेंडींग आहेत म्हनतात.'

'काहून दाखले देत नाहीत लवकर?'

'कधी लाईन नसते.. कधी सर्वर डाऊन असते.. कधी साहेब हजर नसते.. कचाटला मानसाचा जीव.. डिजिटल भारत फक्त नावालेच आहे.. तिकडे तो अंबानी रिचार्ज वाढून राह्यला अन इकडे साईट बंद असते.. तरी म्हनतात भारत महासत्ता व्हनार आहे.'

'लोकसंख्या लय झाली.. तेच काय करतीन?'

'जगात एक नंबर भारताची लोकसंख्या झाली.. त्याच्यावर कोनताच पक्ष बोलत नाही. तिकडे मोदी म्हनते डबल उत्पन्न करु.. इकडे लोकसंख्या डबल होत चालली.'

'मंग आता काय राह्यलं? बँकेचं काम झालं नाही काय?'

'केवायसी करा लागते तुही.'

'मंग करुन घ्या.'

'तुले बँकेत जा लागते. आंगोठा द्या लागते.'

'घरुन जमत नाही काय मोबाईलवर?'

'घरुन काहीच होत नाही. रांगीत उभं राहा लागते.'

'एकखेप पासबुक काढल्यावर केवायसीचं कामच नाही. नवंनवं धसकट काढत राह्यते सरकार.'

'सगळे पैसे खायाचे धंदे लावले.'

'सेतूवाले लुटून राह्यले. एक कागद काढला की द्या शंभरी..'

'हे लाडकी बहीन अन लेकराईचे दाखले एकाच टाईमले आले, म्हनून अशी गर्दी झाली.'

'गर्दी झाली तं कर्मचारी वाढोले पाह्यजात. सुशिक्षित बेकार कमी आहेत काय भारतात?'

'काहीच ताळाले मेळ नाही या सरकारचा..आता तूच जाय बँकेत.. माहा भेजा आऊट झाला.'

# दिंद्रुडमध्ये सर्वांगसुंदर मंदिर राहिले उभा!

## शुभन महागणपतीची प्रतिष्ठापना उत्साहात • डॉ.ओमप्रकाश शेटे यांची संकल्पपुर्ती • भाविक-भक्तांना दर्शनासाठी मंदिर खुले • दिंद्रुडमध्ये लोटणार भक्तीचा अलोट मेळा

दिंद्रुड/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी - बीड महामार्गावर डॉ ओमप्रकाश शेटे ऑरगॅनिक फार्म परिसरात नव्यानेच बांधण्यात आलेल्या सर्वांगसुंदर मंदिरात शुभन महागणपतीची प्रतिष्ठापना विधिवत पूजा अर्चा करून करण्यात आली. दोन दिवस चाललेल्या या आध्यात्मिक कार्यक्रमात शोभायात्रा, होमहवन आदी धार्मिक कार्यक्रमासोबतच शेटे परिवाराच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने डॉ. ओमप्रकाश शेटे यांची मंदिर उभारणीची संकल्पपूर्ती झाली आहे. यावेळी हजारो भाविक भक्तांनी नव्यानेच स्थापित झालेल्या गणरायाचे भक्तिभावाने दर्शन घेतले.

माजलगाव व धारूर तालुक्याच्या संगमावर आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख सौ.शिल्पा व डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी राजस्थानी लाल दगडात गणपतीचे सर्वांग सुंदर मंदिर बांधले आहे. निसर्गरम्य वातावरणात संगम शिवारातील शिवमंगल नगर येथे या मंदिराची उभारणी करण्यात आली आहे. राजस्थानी कलाकारांनी तब्बल तीन



वर्ष अथक मेहनत घेऊन दगडांवर आकर्षक कलाकुसर करून मंदिराची निर्मिती केली आहे.

> कुठलेही कार्य निर्विघ्न पार पडावे यासाठी विघ्नहर्ता श्रीगणेशाचे स्मरण केले जाते. गणपती ही बुद्धीची देवता आहे. त्याच्या दर्शनाने सद्बुद्धी प्राप्त होते. दिंद्रुड पंचक्रोशीत व परळी बीड महामार्गावर जवळपास गणपतीचे मंदिर नाही. त्यामुळे दर्शनासाठी गणेशभक्तांची सोय व्हावी व गजाननाचे मनमोहक रूप डोळे भरून पाहता यावे यासाठी शुभम महागणपतीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. विघ्नहर्ताच्या कृपादृष्टीने आपल्या आयुष्यातील सर्व कष्ट दूर होतील. सर्वांसाठी हे मंदिर खुले असणार आहे तेव्हा प्रवाशांनी व पंचक्रोशीतील नागरिकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा.
>
> - डॉ. ओमप्रकाश शेटे (प्रमुख - आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समिती)

सदरील मंदिरात स्वामीजींच्या मंत्रोच्चारात विधिवत पूजाअर्चा करून शुभन महागणपतीची प्रतिष्ठापना करण्यात आली.प्राणप्रतिष्ठेच्या निमित्ताने गणरायाच्या मनमोहक मूर्तीची पारंपारिक वाद्यांच्या गजरात गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. सदरील शोभायात्रेत श्रीसंत ज्ञानोबाराय वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी व महिला पारंपारिक वेशभूषेत सहभागी झाले होते. हरी ओम नमः शिवाय आणि गणपती बाप्पा मोरया च्या जयघोषात व टाळ मृदंगाच्या निनादात निघालेली मिरवणूक लक्षवेधी ठरली. यावेळी गणेश भक्तांनी पखवाजावर ताल धरत फुगड्यांचा आनंद घेतला. खोलेश्वर मंदिरापासून निघालेल्या शोभायात्रेचा समारोप ओम साईशिल्प या निवासस्थानी करण्यात आला. यावेळी ह भ प वैजनाथ महाराज काशीद, ह भ प सुशेन महाराज काशीद, शि भ प सूर्यकांत आप्पा काटकर आदी संप्रदायातील मंडळीसह पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शुभन महागणपतीची प्रतिष्ठापना करण्यासाठी बीड येथील ओंकार स्वामी व त्यांचे सहकारी उपस्थित होते. पान २ वर...

# केजमध्ये दारू साठा सोडून दिला म्हणे?

चर्चा : वरिष्ठांनी चौकशी करण्याची मागणी



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज पोलीस ठाणे हद्दीतील मस्साजोग येथे शनिवारी (दि.१३) दारुसाठा पकडण्यात आला. याबाबत कारवाई न करता तोडपाणी करुन पोलीस कर्मचाऱ्याने सोडून दिल्याची केजमध्ये जोरदार चर्चा सुरू आहे. परंतु दोन दिवस उलटून गेले तरी याबाबत पोलीस उपाधीक्षक आणि पोलीस निरीक्षकांची हाताची घडी तोंडावर बोट असेच दिसून येत असल्याने याबाबत खुलासा करावा अशी मागणी करण्यात येत आहे. केज पोलीस ठाणे हद्दीत अनेक अवैध धंदे सुरु असून, पोलिसांच्या नाकाखाली हे धंदे सुरू आहेत परंतु यावर कारवाई होत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. मस्साजोग येथेही दि.१३ बसस्थानकावरील एका हॉटेलवर छापा मारला असता या छाप्यात पोलिसांच्या हाती दारुचा मोठा अवैध साठा मिळून आला. परंतु यावर कायदेशीर कारवाई करण्याऐवजी सदरील कर्मचाऱ्याने हॉटेल चालकासोबत हातमिळवणी करुन, तोडपाणी करुन त्या हॉटेल चालकाला सोडून दिले असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. परंतु दोन दिवस होत असलेतरी पान २ वर...

# आषाढी एकादशीनिमित्त बंदोबस्त द्यावा!

अनिल जगताप:पोलीस अधीक्षकांना निवेदन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्राची धाकटी पंढरी म्हणून संबोधल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र नारायण गड येथे आषाढी एकादशी निमित्त पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या जातात. पंचक्रोशीतील विविध गावांमधून वारकरी भाविक आषाढी वारी निमित्त विठुनामाचा जयघोष करत टाळ- मृदुंगाच्या गजरात दिंडीच्या माध्यमातून पायी चालत गडावर येतात. जिल्ह्यासह विविध भागातून श्री क्षेत्र नारायणगड येथे भाविकांची मांदियाळी होते. अशा या परिस्थितीमध्ये यादिवशी कुठलाही अनुचित प्रकार होवू नये, भाविकांच्या सोयीसाठी, वाहतूक आणि पार्किंग व्यवस्था शिस्तीचे



नियोजन राखण्याकरिता पोलीस बंदोबस्ताची नितांत आवश्यकता भासते. यासाठी आज दि. १५ जुलै रोजी दुपारी १.०० वाजताच्या दरम्यान दि. १७ रोजी आषाढी एकादशी निमित्त महाराष्ट्राची धाकटी पंढरी श्री. क्षेत्र संस्थान नारायणगड येथे पोलीस बंदोबस्त देवून प्रशासनाने सहकार्य करावे या मागणीचे निवेदन पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांना श्री क्षेत्र संस्थान पान २ वर...

# सावकाराच्या जाचास कंटाळून आत्महत्या!

दुःखद : संजय गुंडच्या जाचास कंटाळून आत्महत्या

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज शहरातील भीमनगर भागातील धम्मपाल नंदकुमार मस्के (वय ३१) हा तरुण नगरपंचायतीत सफाई कामगार पदावर कार्यरत होता. धम्मपाल याने त्याच्या आईच्या आजारावर उपचार करण्यासाठी शहरातील गुंडगल्ली भागातील खाजगी सावकार संजय रामा गुंड याच्याकडून ५० हजार रुपये व्याजाने घेतले होते. त्याबदल्यात सावकार संजय गुंड याने त्याचे पासबुक व एटीएम कार्ड त्याच्याकडे ठेवले होते. तो त्याची पगार झाली की त्याचे दुचाकीवर बसवून बँकेकडे नेऊन एटीएमव्दारे पैसे काढून चक्रीवाढ व्याजाने पैसे घेत होता. त्याने दिलेल्या ५० हजार रुपयांच्या रक्कमेची परतफेड केली असताना तो नेहमी तुझ्याकडे व्याजाचे पैसे राहिले आहेत. असे म्हणत वारंवार पैसे मागून त्रास देत असल्याने धम्मपाल हा नेहमी घरी येऊन चिंताग्रस्त बसत होता. त्याला त्याच्या आईने व नातेवाईकांनी समसावून सांगत. तर त्याचे शंकर रामभाऊ फंदे यांनी सावकार संजय गुंड यास आंबेडकर चौकात समजावून सांगून व्यवहार मिटवून घ्या असे सांगितल्यावर गुंड याने आमचे आम्ही बघून घेऊ म्हणाला होता. तर ५ जुलै रोजी संजय गुंड याने आंबेडकर चौकात व्याजाचे पैशाची मागणी करीत धमकावून पैसे न दिल्यास पान २ वर...

# वारकऱ्यांसोबत पायी दिंडीत रमले!

आध्यत्मिक:डॉ.योगेश क्षीरसागरांनी दिंड्यांना दिल्या भेटी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

पाऊले चालती पंढरीची वाट म्हणत हजारो वारकऱ्यांनी पंढरपूरकडे प्रस्थान केले आहे. पंढरपूरनजीक असलेल्या बंडी शेगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर हे सोमवारी (दि.१५) पायी दिंडी, पालखीत सहभागी झाले. त्यांनी बीड जिल्ह्यातून प्रस्थान केलेल्या अनेक दिंड्यांना भेटी दिल्या. टाळ मृदंगाच्या निनादात अन् विठूरायच्या जयघोषात ते तल्लीन झाल्याचे पहायला मिळाले.

डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बीड तालुक्यातील नेकनूर येथील वै.श्रीगुरु बंकटस्वामी महाराज संस्थान नेकनूर, वानगाव येथील



**सकारात्मक ऊर्जा मिळाली: डॉ.क्षीरसागर**

मी आज दिंडीत सहभागी होऊन बा पांडुरंगाच्या भक्तीत तल्लीन झालो. येथील भक्तिमय वातावरणातील ऊर्जा जीवनात सकारात्मकता निर्माण करते आणि सदकार्यासाठी बळ देईल. हा अनुभव सकारात्मक ऊर्जा प्रदान करणारा वाटतो, अशी प्रतिक्रिया डॉ. योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केली.

दिंडी क्र.६२, लिंबागणेश येथील बेलेश्वर संस्थान, गेवराई येथील दिंडीसह विविध दिंड्यांना भेटी दिल्या. यावेळी पान २ वर...

# बस बंद झाल्याने प्रवाशांचे हाल!

बोंबला : गुत्तेदाराच्या दुर्लक्षाने कामाचा खोळंबा



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

रस्त्याच्या रखडलेल्या कामामुळे एस टी सेवा बंद होऊन तीन चार गावातुन केजला शाळा महाविद्यालयासाठी येणाऱ्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनी व वयस्कर प्रवाशांचे मोठे हाल सुरू आहेत. केज तालुक्यातील कानडी माळी या गावांमध्ये रस्त्याचे काम गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे. सध्या तर ते अर्धवट अवस्थेतच सोडून संबंधित गुत्तेदार त्याकडे दुर्लक्ष करत आहे यामुळे या अर्धवट कामामुळे रस्त्यावरुन मोठी वाहने जायला अडथळा निर्माण झाला आहे. यामुळेच बस सेवा देखील मागील महिन्यापासून बंद झालेली आहे. कानडी मधुन साबला, धर्माळा या गावांना जाणाऱ्या लोकांची यामुळे मोठी गैरसोय झाली आहे. एस टी बस बंद झाल्याने या बसने केजला शाळा पान २ वर...

# 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा ऑनलाईन फॉर्म भरा!

राजेंद्र मस्के : भाजपा जनसंपर्क कार्यालयात मोफत सुविधा केंद्र

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या संकल्पनेतून आपला भाऊ, आपल्या सेवेत भाजपा कामगार मोर्चाच्या वतीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना व घरेलू महिला कामगार नोंदणी फॉर्म या सर्व योजनांचे ऑनलाईन फॉर्म भरण्याकरिता विनामुल्य सेवा सुविधा केंद्र संघर्षयोद्धा भाजपा जनसंपर्क कार्यालय, कॅनॉल रोड, बीड येथे आज सकाळी ११.०० वा शुभारंभ होत आहे. २१ ते ६५ वयोगटातील पात्र सर्व महिला भगिनींनी मोफत फॉर्म भरून घ्यावेत. असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

भाजपा राष्ट्रीय सचिव आ.पंकजाताई



गोपीनाथराव मुंडे यांनी मध्यप्रदेश मधील लाडली बहना या योजनेच्या धर्तीवर महिलांचे वैयक्तिक आर्थिक सबलीकरण करण्याच्या हेतूने राज्यातील महिलांसाठी योजना तातडीने सुरू करावी अशी मागणी केली होती. त्यांच्या आग्रहानुसार राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, ना. अजित दादा पवार यांनी राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कार्यान्वित केली आहे. महिलांचे वैयक्तिक आर्थिक सबलीकरण करण्याच्या हेतूने दर महा १५०० हजार रुपय मानधन अर्ज दाखल केलेल्या महिलांना मिळणार आहेत. ही योजना राज्यात तातडीने सुरू केली असून, या योजनेचा लाभ घेण्यासाठी २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांनी आपले फॉर्म ऑनलाईन भरणे आवश्यक आहे. महिलांच्या सुविधेसाठी आपला भाऊ आपल्या सेवेत ही संकल्पना घेऊन, भारतीय जनता पार्टीच्या वतीने राजेंद्र मस्के पान २ वर...

# गणराज नागरी सहकारी बँकेच्या निवडी

अभिनंदनिय:अध्यक्षपदी संतोष उपरे तर उपाध्यक्षपदी रविंद्र दळवी



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड येथील प्रसिध्द् उद्योजक, सत्यशोधक ओबीसी परिषदेचे संस्थापक अध्यक्ष व गणराज नागरी सहकारी बँकेचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत हनुमंतराव उपरे (काका) यांनी १९९७ साली बँकेची स्थापना करुन जिल्हातील सहकार क्षेत्रात आपले पाय ठेवले व या बँकेच्या माध्यमातुन बीड सारख्या मागसालेल्या जिल्ह्यामध्ये उसतोड कामगार, दलित अल्पसंख्याक व मागासलेल्या गरीब होतकरु बेरोजगारांच्या जीवनात बँकेच्या माध्यमातुन नवक्रांती घडवुन आणण्याचे काम केले. हे काम करत असताना त्यांचे अकाली निधन झाले. गेल्या २० वर्षापासुन उपरे काकांनी बँकेच्या सन्मानणिय सभासदांना विश्वासात घेऊन त्यांच्या अडी-अडीचणींना सामोरे जाऊन त्यांचे प्रश्न् सोडविण्याचा प्रयत् केला. त्यामुळे बिनविरोध त्यांची बँकेच्या अध्यक्षपदी निवड होत असे, त्यांच्याच पाऊलावर पाऊल ठेवुन त्यांचे ज्येष्ठ् पुत्र संतोष उपरे यांनी संचालक मंडळ आणि सन्मानणिय सभासदांना पान २ वर...

भेट | बार्टी केंद्रात अनिल जगताप यांचे प्रतिपादन

# संधी मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील युवकांना नोकरीच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत.कारण जिल्ह्यात इंडस्ट्रीयल एरिया नसल्याने अनेक तरुणांना नोकरीच्या शोधात भटकावे लागते. त्यामुळे आगामी काळात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रश्न आणि रोजगार संधी मिळवून देण्यासाठी पावले उचलणार आहोत. असे प्रतिपादन शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख अनिल दाद जगताप यांनी व्यक्त केले.

बीड शहरातील सावंत प्लाझा, मित्र नगर चौकाजवळ शिवाजी नगर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे मान्यताप्राप्त सम्राट प्रतिष्ठान संचलित छत्रपती राजर्षी



शाहू स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख अनिल दादा जगताप यांनी सदिच्छा भेट दिली असता ,त्यावेळी ते बोलत होते.यावेळी संस्थेचे संचालक राहुल वाघमारे, पत्रकार सुनिल डोंगरे, माजी नगरसेवक सुनिल अनभुले,माजी पंचायत समिती सदस्य दिपक काळे, केंद्र प्रमुख प्रा.अविनाश वडमारे, फिजिकल ट्रेनर दिपक सोनवणे, लिपिक दिलिप गायकवाड, ग्रंथपाल सचिन काकडे आदी उपस्थित होते. यावेळी अनिल दादा जगताप म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे मान्यता प्राप्त सम्राट प्रतिष्ठान संस्थेचे काम उल्लेखनिय असून स्पर्धा परीक्षा तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना सुसज्य आशा शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना याचा फायदा आणि एक चांगली संधी मिळते आहे. आगामी काळात आपण शिक्षित आणि उच्च शिक्षित युवकांना रोजगार आणि नोकरीच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी कटिबद्ध आहोत.त्यामुळे विद्यार्थी वर्गाने करिअरवर फोकस करुन आपली वाटचाल सुरु ठेवावी.असे विचार अनिल दादा जगताप यांनी व्यक्त केले.

# शिवसेना शेतकरी सेनेची धुरा!

निवड : जिल्हाप्रमुखपदी परमेश्वर डाके नियुक्त

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व श्रीकांत शिंदे यांच्या आदेशाने शेतकरी सेनेचे महाराष्ट्राचे अध्यक्ष धनंजय जाधव यांच्या संमतीने शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक व अनिल जगताप यांनी शिवसेना शेतकरी सेनेच्या जिल्हाप्रमुख पदी परमेश्वर डाके यांची निवड करून नियुक्तीपत्र देण्यात आले

बीड तालुक्यातील काठोडा येथील परमेश्वर डाके हे अनेक वर्षापासून शिवसैनिक म्हणून सक्रीय काम करत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन शिवसेना शेतकरी सेनेच्या जिल्हाप्रमुखपदी डाके यांची निवड करण्यात आली.



यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, अनिल जगताप यांच्या हस्ते डाके यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी मुळूक यांनी वंदनीय बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांचा हिंदुत्वाचा विचार व शिकवण यांचा सक्रियपणे प्रचार करून मुख्यमंत्री पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांचे हात बळकट करण्यासाठी व शिवसेना पक्षाला बळकटी देण्यासाठी किसान सेनेच्या पान २ वर...